रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २५८
www.ramprahar.com
शनिवार, ५ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
ऐरोलीत मँग्रोव्ह पार्क उभारण्यासाठी प्रयत्न/२
रायगड जिल्ह्यात मुद्रांक शुल्क वसुलीचे ९२ टक्के उद्दिष्ट साध्य/५
दोन्ही हातांनी गोलंदाजी करून विकेटही घेतली/८

## संसदेच्या अधिवेशनाचे सूप वाजले; १६ विधेयके मंजूर



**नवी दिल्ली :** संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारी (दि. ४) संस्थगित करण्यात आले. या अधिवेशनामध्ये सरकारने देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडला, वक्फ सुधारणा विधेयक, त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक, स्थलांतर आणि विदेश विधेयक यांना दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला सभागृहात म्हणाले की, या अधिवेशनात लोकसभेच्या एकूण २६ बैठका झाल्या आणि त्यांची उत्पादकता ११८ टक्के होती. या काळात १० नवीन सरकारी विधेयक मांडण्यात आली आणि १६ विधेयके मंजूर करण्यात आली. राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी समारोपप्रसंगी सर्व सदस्यांचे सक्रिय योगदान दिल्याबद्दल आभार मानले. या अधिवेशनात ४९ खाजगी विधेयके सादर करण्यात आली, जो एक नवीन विक्रम आहे, असे ते म्हणाले.

# भाजप उत्तर रायगड जिल्हा बैठक

## प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची लाभली प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या सुचनेनुसार शुक्रवारी (दि. ४) उत्तर रायगड जिल्ह्याची बैठक पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पक्षाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.



या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार सुरेश लाड, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, उरण मंडल अध्यक्ष रवी भोईर, खालापूर अध्यक्ष प्रवीण मोरे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी, विविध मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष व सरचिटणीस, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, संघटन पर्व पदाधिकारी उपस्थित होते.

वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाल्याबद्दल देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय अल्पसंख्याकमंत्री किरेन रिजिजू यांच्या अभिनंदनाचा या बैठकीत ठराव मांडण्यात आला. त्याला सर्व उपस्थितांनी अनुमोदन देत टाळ्यांच्या कडकडाटात आनंद व्यक्त करण्यात आला.

या वेळी संघटन पर्व आढावा, स्थापना दिवस कार्यक्रम, संघटनात्मक निवडणूक तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या रायगड दौऱ्याबाबत चर्चा झाली.



**मुंबई : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एका कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची शुक्रवारी राजभवनात सदिच्छा भेट घेतली. या वेळी या मान्यवरांनी संवाद साधत एकमेकांची विचारपूस केली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासमवेत भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख उपस्थित होते. /वृत्त पान ३ वर..**

# ट्रॅक्टर विहिरीत कोसळून सात महिलांचा मृत्यू

## नांदेडमध्ये भीषण अपघात

**नांदेड, हिंगोली : प्रतिनिधी**

हळद काढणीसाठी महिला मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर ट्रॉलीसह विहिरीत कोसळल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. ४) सकाळी नांदेडमधील आलेगाव शिवारात घडली. या भीषण अपघातात सात जणींचा मृत्यू झाला असून तिघे बचावले आहेत.

हिंगोलीच्या वसमत तालुक्यातील गुंज येथील मजूर हळद काढणीच्या कामासाठी आलेगाव शिवारात जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टर ट्रॉलीसह विहिरीत कोसळला. पोलिसांसह स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. या अपघातात सात



महिलांचा मृत्यू झाला, तर दोन महिला व एक पुरुष बचावला आहे.

मृतांमध्ये ताराबाई सटवाजी जाधव (वय ३५), ध्रुपता सटवाजी जाधव (१८), सरस्वती लखन बुरड (२५), सिमरन संतोष कांबळे (१८), चउत्राबाई माधव पारधे (४५), ज्योती इरबाजी सरोदे (३५) सपना तुकाराम राऊत (२५) यांचा समावेश आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर शोक व्यक्त करीत मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांचे अर्थसहाय्य जाहीर केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दुःख व्यक्त करून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल, असे जाहीर केले आहे.

## वक्फ सुधारणा विधेयकाचे कायद्यात होणार रूपांतर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक पारित झाल्यानंतर राज्यसभेमध्येही हे विधेयक सहजपणे पारित करून घेण्यात केंद्र सरकारला यश आले. राज्यसभेमध्ये १३ तासांच्या मॅरेथॉन चर्चेनंतर रात्री उशिरा झालेल्या मतदानावेळी या विधेयकाच्या बाजूने १२८ मते पडली, तर ९५ सदस्यांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केले.

दोन्ही सभागृहात मंजूर झालेले हे विधेयक आता मान्यतेसाठी राष्ट्रपतींकडे पाठवण्यात येईल. त्यांच्या मान्यतेनंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल. त्यामुळे आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणे केवळ एक पाऊल दूर आहे.

# वेळेत उपचार न मिळाल्याने पुण्यात गर्भवती महिलेचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेला आपला जीव गमवावा लागला. या घटनेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली असून धर्मादाय सहआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश दिले आहेत.

आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिषा भिसे यांच्याबाबत हा दुर्दैवी प्रकार

## मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश



घडला आहे. गर्भवती अवस्थेत त्यांना वेदना सुरू झाल्याने मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र तेथे सांगितलेली मोठी रक्कम लगेच भरणे शक्य नव्हते. त्यामुळे नातेवाईकांनी गर्भवतीला दुसऱ्या रुग्णालयात हलवले. या महिलेने जुळ्या बाळांना जन्म दिला, मात्र तिचा मृत्यू झाला. मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे गर्भवतीचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, पुणे धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीमध्ये उपसचिव यमुना जाधव, सहकक्षप्रमुख तथा कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी, सर जे.जे. रुग्णालय समूह, मुंबईचे अधीक्षक हे सदस्य असतील, तर विधी व न्याय विभागाचे उपसचिव सदस्य सचिव असणार आहेत.

## निवडक

### ‘चॅटजीपीटी’ने चार दिवसांत केल्या ७० कोटी घिबली प्रतिमा

**मुंबई :** १ एप्रिलपासून ओपनएआय कंपनीने घिबली या ट्रेंडची सेवा युजर्संना उपलब्ध करून दिली. यानंतर तब्बल चारच दिवसांत चॅटजीपीटीवर जवळपास १३ कोटींहून अधिक युजर्संनी ७० कोटींहून अधिक घिबली प्रतिमा तयार केल्या आहेत, अशी माहिती एआय कंपनी ओपनएआयने दिली. विशेष म्हणजे भारतातील युजर्सकडून सर्वाधिक घिबली ॲनिमी इमेजेस बनवण्यात आल्या असून भारत एआयमध्ये जगाला मागे टाकत असल्याचे ओपनएआयच्या सीईओंनी म्हटले आहे.

### ‘तो’ सागर कारंडे मी नव्हेच! अभिनेत्याने केले स्पष्ट

**मुंबई :** ‘चला हवा येऊ द्या’ फेम सागर कारंडे सायबर क्राइमचा शिकार झाल्याचे वृत्त समोर आले होते. इन्स्टाग्राम पोस्ट लाइक करून १५० रुपये मिळवण्याच्या नादात सागरने तब्बल ६१.८३ लाख रुपये गमावल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली होती, मात्र तो सागर कारंडे मी नसल्याचे या अभिनेत्याने स्पष्ट केले आहे.

# ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार काळाच्या पडद्याआड

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ अभिनेते आणि चित्रपट निर्माते मनोज कुमार यांचे शुक्रवारी (दि. ४) मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. मनोज कुमार त्यांच्या देशभक्तीपर चित्रपटांसाठी लोकप्रिय होते, ज्यामुळे त्यांना ‘भारत कुमार’ असे नाव मिळाले होते.

मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी गोस्वामी होते. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी फाळणीनंतर पाकिस्तानचा भाग बनलेल्या अबोटाबाद येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची खूप आवड होती. १९५७मध्ये आलेल्या ‘फॅशन’ या चित्रपटातून यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. यानंतर १९६०मध्ये त्यांचा ‘कच्ची की गुडिया’ हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात ते मुख्य अभिनेत्याच्या भूमिकेत दिसले, जो यशस्वी झाला.



मनोज कुमार यांनी ‘उपकार’, ‘पत्थर के सनम’, ‘रोटी कपडा और मकान’, ‘पूरब और पश्चिम’, ‘संन्यासी’ आणि ‘क्रांती’सारखे अप्रतिम चित्रपट दिले.

मनोज कुमार यांनी पटकथा लेखक, गीतकार आणि संपादक म्हणूनही आपले कौशल्य सिद्ध केले. भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल सरकारने त्यांना १९९२मध्ये पद्मश्री आणि २०१५मध्ये प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# शिवरायांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा

## परस्पर समन्वयाने जबाबदारी यशस्वी करा –मंत्री आदिती तटकरे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या स्मृतिदिन कार्यक्रमास १२ एप्रिल रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह किल्ले रायगडावर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी (दि. ४) महाड येथे आयोजित बैठकीत घेतला.



या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे, पुरातत्व विभागाचे अधिकारी राजेश दिवेकर, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, कार्यवाह सुधीर थोरात, महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे सदस्य आणि विविध विभागांचे संबंधित अधिकारी आदी उपस्थित होते.

या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी प्रशासन, पोलीस, पुरातत्व विभाग तसेच स्थानिक समित्या यांनी परस्पर समन्वयाने कार्यक्रमाचे दिमाखदार नियोजन करावे, असे निर्देश दिले. एप्रिल महिन्यात असलेल्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी, औषधे यांचा साठा ठेवावा. गडावर येणाऱ्या महिला व पुरुष यांच्यासाठी पुरेशी स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या तसेच प्रत्येक विभागाने आपापली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी, असे सांगितले.

# अलिबागमध्ये रंगणार रायगड कबड्डी लीग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे रायगड कबड्डी लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील मैदानावर ७ ते १० एप्रिल या कालावधीत ही स्पर्धा खेळवली जाणार आहे असून जिल्ह्यातील अव्वल खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी कबड्डीप्रेमींना मिळणार आहे, अशी माहिती रायगड कबड्डी लीगचे अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांनी शुक्रवारी (दि.४) पेझारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

स्पर्धेत आठ संघ सहभागी होणार आहेत. यामध्ये ओपी इगल्स, एम.डी. वॉरियर्स, पेण वॉरियर्स, ए.पी. सुपरप्लेअर्स, आवास वायपर्स, समिरा छावा, एस.बी. फायटर्स, व्ही.जी. टायगर्स या संघांचा समावेश आहेत. स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील ९६ अव्वल खेळाडू निवडण्यात आले आहेत. हे खेळाडू आठ संघांमध्ये खेळतील. प्रत्येक संघात एक असे आठ खेळाडू इतर जिल्ह्यांतील असतील.




स्पर्धेत खेळणाऱ्या आठ संघांवर प्रत्येकी सुमारे दोन लाख रुपये खर्च रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन करणार आहे. प्रत्येक खेळाडूस बूट व कबड्डीचा गणवेश असोसिएसनातर्फे देण्यात येणार आहे. विजेत्या संघांना रोख रक्कम व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येईल.

चार दिवस चालणारी ही स्पर्धा मॅटवर खेळवली जाणार आहे. स्पर्धेतील सामने सुपर लीग पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. सुमारे सात हजार प्रेक्षक बसू शकतील अशी गॅलरी उभारण्यात आली आहे. स्पर्धा यशस्वी करण्याकरिता विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, खेळाडू परिश्रम घेत आहेत, असे ॲड. आस्वाद पाटील यांनी सांगितले.

> **स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात भाषणबाजी नसेल. स्पर्धेच्या ठिकाणी कोणत्याही नेत्याचे कटआऊट लावले जाणार नाहीत. फक्त आठ संघातील खेळाडूंचे फोटो असतील तसेच संघ मालक व खेळाडूंच्या कमानी उभारण्यात येणार आहेत.**
> **–ॲड. आस्वाद पाटील,**
> **अध्यक्ष, रायगड कबड्डी लीग**

या वेळी माजी आमदार पंडित पाटील यांच्या हस्ते स्पर्धेच्या चषकाचे अनावरण करण्यात आले. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सरकार्यवाह चित्रा पाटील, कार्याध्यक्ष संजय पाटील, सहकार्यवाह जे.जे. पाटील, शरद कदम, संजय मोकल, दिलीप धुमाळ, हिराचंद पाटील, सुनील पाटील, यतीन घरत, जगन पाटील, जनार्दन पाटील, सुमन पाटील, सवाई पाटील आदी उपस्थित होते.

# कर्जत, खालापुरात वादळी पाऊस

**कर्जत, चौक,**
**खालापूर : प्रतिनिधी**

कर्जत, खालापूर तालुक्यात शुक्रवारी (दि. ४) संध्याकाळी वादळी वारा आणि ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पाऊस पडला. या पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला, मात्र काहींचे नुकसान झाले आहे.

दुपारपासूनच पावसाचे वातावरण तयार झाले होते. ४ वाजल्यानंतर धुळीचे लोट उठून काळोख पडण्यास सुरुवात झाली आणि मग पावसाचे आगमन झाले. यामुळे शेतपिकांना फटका बसला आहे. जनावरांचा चारा भिजून गेला. वीटभट्टीमालकांना काही प्रमाणात हानी पोहचली. सध्या लग्नसराई असल्याने लग्नघरी तारांबळ उडाल्याचे दिसून आले. तेथे मंडप भिजून





नुकसान झाले आहे.

खालापूरमध्ये वाऱ्याचा जोर अधिक होता. वासांबे महसूल मंडळातील वाणिवली, तळवली येथील घरांचे व चौक येथील नेताजी पालकर विद्यामंदिर या शाळेचे पत्रे उडून मोठे नुकसान झाले आहे. चौकमध्ये महसूल अधिकारी अक्षय गावडे यांनी घटनास्थळी धाव घेत नुकसानीचे पंचनामे केले, तर वाणिवली व तळवली परिसरात महसूल मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर व अभिजित हिरवकर यांनी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. ज्यांचे नुकसान झाले आहे अगर ज्यांना माहिती उपलब्ध झाली आहे, त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तहसीलदार अभय चव्हाण यांनी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

कर्जतमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. हा पाऊस इतका जोरदार पडत होता की, जुलै महिन्याच्या पावसाची आठवण आली. सुमारे तासभर पाऊस पडत होता. काही ठिकाणी पाणीही साचले तसेच वीजपुरवठा खंडित झाला होता. एकूणच अवकाळी पावसाने दाणादाण उडवल्याचे चित्र आहे.

# ऐरोलीत मँग्रोव्ह पार्क उभारण्यासाठी प्रयत्न

अहवाल तयार करण्याचे वनमंत्री गणेश नाईकांचे आदेश



**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबई भागातील ऐरोली खाडी किनारी मोठ्या प्रमाणात कांदळवन असून येथे फ्लेमिंगो पक्ष्यांचे वास्तव्य असते. पर्यटनाच्या दृष्टिने या भागात कांदळवन सफारी पार्क (मँग्रोव्ह पार्क) उभारण्याच्या दृष्टिने अभ्यास करून अहवाल देण्याचे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले. वन विभागाच्या विविध विषयासंदर्भात वनमंत्री नाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी महाराष्ट्र इस्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक शोमिता बिश्वास, उपसचिव विवेक होसिंग, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक बी.व्ही. रामाराव आदी उपस्थित होते. नाईक म्हणाले की, पर्यटन विकासासाठी नवी मुंबईतील खाडी किनारी उत्तम संधी आहेत. कांदळवन, फ्लेमिंगो पक्षी हे निसर्ग पर्यटकांसाठी आकर्षण ठरू शकतात.त्यामुळे या परिसरातील ऐरोली, घणसोली या भागात जागतिक दर्जाचे मँग्रोव्ह पार्क उभारता येईल का याचा अभ्यास करून जागा पाहणी करावी. यासंदर्भातील सविस्तर अहवाल द्यावा. बिबट सफारीच्या अभ्यासाची वन्यजीव व मानव संघर्ष टाळण्यासाठी उपाय योजना करण्यात याव्यात. विशेषतः जुन्नर, कराड व संगमनेर परिसरात मोठ्या प्रमाणात बिबट्यांचा वावर आहे. राजस्थानमधील जवाई बिबट सफारीच्या धर्तीवर या तीन तालुक्यातही बिबट सफारी करता येईल का याचाही अभ्यास करण्याचे निर्देश वन मंत्री नाईक यांनी दिली.

***आंतरराष्ट्रीय प्रजनन केंद्र***

*रान म्हैस, माळढोक या सारख्या संकटग्रस्त प्रजाती वाचविण्यासाठी नागपूरमधील गोरेवाडा प्रकल्पात आंतरराष्ट्रीय प्रजनन केंद्र स्थापण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीबरोबर सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेतला असून या संदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही नाईक यांनी यावेळी दिले. परदेशी यांनी आंतरराष्ट्रीय प्रजनन केंद्र व बीएचएनएसबरोबरचा करार महत्त्वाचा असून यास चालना देण्याची आवश्यकता व्यक्त केली.*

# पनवेल पालिका क्षेत्रात सात शाळा अनधिकृत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या परवानगीशिवाय सात शाळा सुरू असल्याचे पालिकेच्या शिक्षण विभागाने जाहीर केले असून या शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये असे आवाहन पालकांना केले आहे.

दरवर्षी शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात येते. पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी सूचना केल्याप्रमाणे पालिकेच्या शिक्षण विभागाने अनधिकृत शाळा तपासण्याची मोहीम राबवली. या मोहीमेमध्ये तळोजा परिसरामध्ये ६ आणि कळंबोलीत एक शाळा विना परवानगी सुरू असल्याचे आढळले. संबंधित अनधिकृत शाळांविरूध्द दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याची माहिती पालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी दिली.

पालकांना आवाहन करतो की आपल्या पाल्याचे प्रवेश या शाळांमध्ये करू नयेत. जर या शाळांमध्ये अगोदरच प्रवेश झाले असतील तर ते प्रवेश अधिकृत शाळेत होण्यासाठी इतर नजीकच्या शाळेत समायोजन करण्याचे नियोजन करण्यात येईल. यानंतर देखील काही अनधिकृत शाळा आढळून आल्यास त्यांची नावे घोषित करून त्यांच्यावरही नियमानुसार कारवाई करण्यात येईल. पालकांनी अशा शाळेत आपल्याला पाल्यांना प्रवेश घेऊ नये असे अवाहन पालिकेने केले आहे

## अनधिकृत शाळांची यादी

- मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल, ओवे,
- काळसेकर इंग्लिश मिडियम स्कूल, तळोजा पाचनंद
- अर्कम इंग्लिश स्कूल, तळोजा
- ओशीन ब्राईट कॉनव्हेंट स्कूल, तळोजा
- ऑक्सफोर्ड इंग्लिश मिडियम स्कूल, कळंबोली
- बजाज इंटरनॅशनल स्कूल, तळोजा
- दि वेस्ट हिल हाय इंटरनॅशनल स्कूल, तळोजा

# पाली-खोपोली मार्गावर अपघात

## उपनिरीक्षक प्रवीण धडे व कुटुंबिय गंभीर जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली मार्गावर महाडचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण शहाजी धडे यांच्या कारला आयसर टेम्पोने जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला, या अपघातात प्रवीण धडे यांच्या सह पत्नी, आई,आणि दोन मुले गंभीर जखमी झाले आहेत



पाली-खोपोली मार्गावरून महामार्ग पोलीस केंद्र महाडचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण शहाजी धडे (वय ३५ रा उल्हासनगर) हे आपली स्विफ्ट कार घेऊन कुटूंबासमवेत पाली ते खोपोली असा प्रवाश करत असताना ते शेमडी गावाजवळ आले असता समोरील येणारा आयसर टेम्पो चालक विजय सुभाष पाटील( रा धुळे ) याने भरधाव वेगात ओव्हरटेक करीत असताना` नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील कारला जोरदार धडक दिली, या अपघातात उपनिरीक्षक प्रवीण धडे यांच्या डोक्याला आणि हातापायाला गंभीर दुखापत झाली आहे, तर पत्नी करिष्मा यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे, तर आई महानंदा यांच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली मुलगा यज्ञेश याच्या छातीला आणि हाता पायाला गंभीर दुखापत तर दुसरा मुलगा तनिष याच्याही हातापायाला किरकोळ दुखपत झाली असून धडे यांचे संपूर्ण कुटूंब या अपघातात गंभीर जखमी झाले आहे,

या सर्वांना तात्काळ पुढील उपचारासाठी खाजगी ॲम्ब्युलन्सने एमजिएम येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, या अपघातानंतर चालक हा पळून गेला आहे तर कारचा चक्काचूर झालेला आहे, या अपघाताचा पुढील तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

# पनवेलमध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व युवा कार्य प्रशिक्षण योजना मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्र, अलिबाग-रायगड व पनवेल महानगरपालिका, तसेच तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत उमेदवार निवड मेळावा नुकताच यशस्वीपणे घेण्यात आला.



मेळावा दिनांक ३ एप्रिल रोजी तळोजा येथील तनिष हॉटेल अँण्ड रिसॉर्ट औद्योगिक वसाहत, तळोजा येथे आयोजित करण्यात आला होता. या वेळी कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता विभागीय आयुक्तालय मुंबईचे उपायुक्त सचिन जाधव, पनवेल महानगरपालिका उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर, तळोजा इंडस्ट्रीज असोशिएशनचे अध्यक्ष सतिश शेट्टी, कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता मार्गदर्शक केंद्राचे सहाय्यक आयुक्त अमिता पवार, महापालिकेच्या डेएनयुएलमच्या व्यवस्थापिका विनया म्हात्रे उपस्थित होत्या.

या मेळाव्यात १८ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला होता आणि एकूण ४९४ हून अधिक रिक्त पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यात आली. बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, अॅप्रेंटिसशिप नोंदणी, स्वयंरोजगार मार्गदर्शन आणि विविध शासकीय कर्ज योजनांची माहिती देण्यात आली.

# नवीन कायद्यांबाबत उरण पोलीस ठाण्याकडून शिक्षकांना मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तसेच भारतीय साक्ष अधिनियम २०२३ या नवीन कायद्याची माहिती जनसामान्यांना व अंमलबजावणी यंत्रणेला कायद्याची ओळख करून देण्यासाठी उरण पोलीस ठाण्याच्यावतीने गुरुवार (दि. ३) एप्रिल रोजी भोईर गार्डन ,उरण कोट नाका येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यशाळेत उरण तालुक्यातील अनुदानित, विनाअनुदानित शाळांच्या मुख्याध्यापक,शाळेचे प्रतिनिधी यांना बोलविण्यात आले होते .

या कार्यशाळेत उरण न्यायालयाचे सरकारी वकिल प्रदिप देशमाने यांनी नवीन कायद्यात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या विषयीच्या कायद्यात कोणते बदल झाले आहेत, याची माहिती दिली आणि शिक्षकांनी कोणती काळजी घ्यावी व विद्यार्थ्यांमध्ये जागृकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, याबाबत मार्गदर्शन केले.

न्हावा शेवा ( पोर्ट विभाग) सहाय्यक पोलिसआयुक्त विशाल नेहूल यांनी या नव्या कायद्यांबाबत माहिती दिली. उरणचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक जितेंद्र मिसाळ यांनी सायबर गुन्हे याबाबत नागरिकांची कशी फसवणूक होते आणि ते टाळण्यासाठी आपण काय केले पाहिजे याची माहिती दिली.उरण पंचायत विभागाच्या गटशिक्षण अधिकारी प्रियंका पाटील यांनी सर्व शाळेत सीसी टीव्ही बसविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शाळेत शौचालयांची स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे अशा प्रकारे मार्गदर्शन केले.

# लोणेरे नाक्यावर बसथांबा नसल्याने प्रवासी आणि विद्यार्थ्यांची गैरसोय

**माणगाव : बातमीदार**

मुंबई-गोवा महामार्गांवरील लोणेरे नाक्यावर अनेक वर्षांपासून बसस्थानक होते. परंतु, महामार्गाच्या चौपदरीकरणात ते जमीनदोस्त करण्यात आले आहे. या गोष्टीला आता अनेक वर्षे झाली तरी त्याच्या जागी अद्यापही नवीन बसस्थानक बांधण्यात आले नाही. यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्यामुळे लोणेरे नाक्यावर नवीन बसस्थानक उभारण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरील लोणेरे नाक्यावर गेली अनेक वर्षांपासून बस थांबा स्थानक जणू गायब झाला असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे येथे बसस्थानक नसल्यमुळे महामंडळाच्या लांब पल्ल्याच्या एसटी बसेस लोणेरे जय अंबे स्वीट मार्ट समोर थांबल्यावर बस मागे वाहनांच्या रांगा लागत आहेत. लोणेरे विभागात लोणेरे बसस्टॉपवर मुंबई - पुणे प्रवास करणाऱ्यांची संख्या खूपच आहे. असे असताना बस थांबाच नसल्याचे गाडीची वाट पाहणारे सर्व प्रवासी जय अंबे समोरील सर्व्हिस रोड वर भर उन्हात उभे राहत असल्याने वाहतूक करणाऱ्या वाहनांना देखील याचा त्रास सहन करावा लागत आहे. गोरेगांव , म्हसळा , आंबेत पासून परिसरातील शेकडो गावांसाठी मुंबई - पुणे करता झटपट गाडी पकडण्यासाठी लोणेरे हे एकमेव केंद्रबिंदू समजलं जातं. या नाक्यावरील मध्यवर्ती ठिकाणी बस स्थानक असणे अत्यंत आवश्यक आहे.

तीच परिस्थिती महाडकडे जाणाऱ्या प्रवाशांची आहे. त्या ठिकाणी देखील विनोद मेडीकल समोर सकाळी आणि संध्याकाळी रस्त्यावर एवढी गर्दी पाहून कोकणातून मुंबईकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या काही एसटी बसेस थांबत नसल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,महाड,माणगाव येथे शालेय शिक्षण कॉलेज व उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे. लोणेरे, गोरेगांव परिसरातील गावांतील विद्यार्थी, तसेच प्रवासी नागरिक मुंबईकडे अथवा महाडकडे जाण्यासाठी येत असतात; परंतु दिवसेंदिवस विकसित होत असणाऱ्या लोणेरे नाक्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला बस प्रवासी थांबा नसल्याने येथे विद्यार्थ्यांना व प्रवासी वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत आहे याची संबंधितांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी गायब झालेले बसस्थानक बांधून येथे येणाऱ्या-जाणाऱ्या एसटी बसेस थांबाव्या यासाठी संबंधित शासन, प्रशासन, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

**बसस्थानक तोडण्याला अनेक वर्षे झाली, तरी येथे बस स्थानक बांधण्यात आले नाही. यामुळे प्रवाशांना ऊन पावसात उभे राहावे लागत आहे. त्यामुळे खूपच गैरसोय होत आहे. मुंबई-गोवा महामार्गावर असणाऱ्या अनेक गावांच्या ठिकाणीदेखील बस थांबा नसल्यामुळे प्रवाशांना बसमधून उतरणे आणि चढणे कठीण होते.**

**-संतोष मालोरे, प्रवासी**

# वाशीमध्ये खारफुटीच्या जंगलात नैसर्गिक पदपथ उभारा



## पर्यावरणप्रेमींची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

वन विभागाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे कदाचित पहिल्यांदाच वाशी येथील चार हेक्टर गाडलेल्या खारफुटीच्या जंगलाची पुनर्बांधणी करण्यात आली आहे.रेल्वे स्टेशनजवळील वाशी गावातील सर्व्हे क्रमांक १७ येथील खारफुटीवर टाकण्यात आलेला २५० ट्रक कचरा साफ करण्यात आला आहे. या ठिकाणी खारफुटीचे महत्व अबाधित ठेवण्यासाठी जागरूकता वाढवणे गरजेचे आहे. याठिकाणी नागरिकांना येत यावे यासाठी नैसर्गिक पदपथ उभारण्याची मागणी पर्यावरण प्रेमींनी केली आहे.

मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) खारफुटीच्या जंगलाचे पुनर्बांधणी करण्याची ही पहिलीच वेळ आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनने सांगितले, जे अनेक स्वयंसेवी संस्थांसह भरती-ओहोटीच्या वनस्पती वाचवण्यासाठी मोहीम राबवत आहे. सप्टेंबर २०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने खारफुटीच्या जंगलांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी दिलेल्या निकालानंतरही, नष्ट झालेल्या ठिकाणांचे पुनर्बांधणी करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

एमएमआरमध्ये उरण, उलवे, खारघर, सायन-पनवेल महामार्ग आणि चेंबूर अशा अनेक ठिकाणी खारफुटीच्या हानीची तक्रार केली जात आहे, परंतु किनारपट्टीवरील भरती-ओहोटीच्या हल्ल्यांविरुद्ध आमचे आघाडीचे सैनिक असलेल्या समुद्री वनस्पतींचे पुनर्वसन करण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत, असे सागर शक्तीचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी दुःख व्यक्त केले.कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय खारफुटी स्वतःहून पुन्हा जिवंत होऊ लागली, असे पवार यांनी निदर्शनास आणून दिले.पागोटेसारख्या भागातही, पूर्वीच्या एनएमएसईझेड अंतर्गत खारफुटींवर टाकलेला कचरा साफ करण्यासाठी अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही, परंतु भरतीच्या पाण्याने कचराकुंडी बुडवली आणि समुद्री वनस्पती स्वतःहून वाढल्या, असे कुमार म्हणाले.

रेंज फॉरेस्ट ऑफिसर सुधीर मांजरे यांनी निसर्गप्रेमींना पुनर्वसन केलेल्या जागेला भेट देण्याचे आमंत्रण दिले आहे. वाशी पुनर्संचयित साइटबद्दल, नॅटकनेक्टने वनस्पती वाढण्यापूर्वी खारफुटी वॉक झोन बांधण्याचे सुचवले.या जागेचा वापर जागरूकता पसरविण्यासाठी आणि लोकांना कार्बन सिंक, विविध प्रकारचे मासे आणि खेकडे यांचे प्रजनन स्थळ आणि प्रदूषकांचे फिल्टर म्हणून खारफुटीचे महत्त्व शिकवण्यासाठी खारफुटीच्या मार्ग म्हणून करता येईल, असे कुमार म्हणाले.

# सिडकोचा १४,१३० कोटींचा वैशिष्ट्यपूर्ण अर्थसंकल्प सादर; विविध तरतुदी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी २८ मार्च रोजी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह गृहनिर्माण, नैना, मेट्रो, इंटरनॅशनल एज्युसिटी आणि पाणीपुरवठा योजना अशा विविध प्रकल्पांसाठी २०२५-२६ साठी सर्वाधिक रू. १४,१२० कोटी (खर्च) व रु. १४,१३० कोटी (जमा)चा अर्थसंकल्प सादर केला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना, मेट्रो, इंटरनॅशनल एज्युसिटी, महागृहनिर्माण योजना इत्यादी सिडकोचे प्रकल्प महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसोबतच नवी मुंबईतीलसर्वसामान्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या इतर योजना जसे की कनेक्टिव्हिटी आणि पाणीपुरवठा इत्यादीसाठी २०२५-२६च्या अर्थसंकल्पात १४ हजार १२० कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे हे प्रकल्पनियोजित वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल व सामान्य नागरिकांना दिलासादेखील मिळेल.

नगर विकास क्षेत्रातील अग्रणी प्राधिकरण म्हणून ५५ वर्षांची सिडकोची यशस्वी वाटचाल राहिली असून शहर निर्मितीचा ध्यास घेतलेल्या सिडकोने आपल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांद्वारे आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे. विकासासाठी कटिबद्ध असणाऱ्या सिडकोने नवी मुंबईसह सिडको अधिकारक्षेत्रातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा अधिक पारदर्शक व सुलभ पद्धतीने मिळाव्यात याकरिता ई-प्रशासनाचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणावर साध्य केले आहे.

या अर्थसंकल्पात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना (नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचितक्षेत्र), इंटरनॅशनल एज्युसिटी, मेट्रो प्रकल्प, पाणीपुरवठा योजना, ठाणे क्लस्टर डेव्हलपमेंट, उलवे कोस्टल रोड,खारघर-तुर्भे लिंक रोड, रेल्वे, आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क आणि नवीन शहर प्रकल्प यासारख्या प्रकल्पांसाठी रू.१४,१२० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

आजपर्यंत सिडकोने अनेक आव्हाने यशस्वीपणे पूर्ण केली आहेत.आणि त्याच जबाबदारी आणि उत्तरदायित्वाच्या मोठ्या भावनेसह देशाच्या विकासाप्रती २०२५-२६साठी सर्वाधिक रू. १४,१२० कोटी (खर्च) व रु. १४,१३० कोटी (जमा)चा अर्थसंकल्प सादर केला आहे. सिडकोच्या अर्थसंकल्पातील पारदर्शकता,

उत्तरदायित्व, उत्तम लेखांकन प्रथा आणि कामगिरी यातत्त्वांच्या द्वारे राज्याची आणि महामंडळाची प्रगती साध्य करण्याचे सिडकोचे उद्दीष्ट सुस्पष्ट होत आहे.

**सिडको अर्थसंकल्प २०२५-२६ : एक दृष्टीक्षेप**

**अर्थसंकल्पीय अंदाज (खर्च)**

| क्र. | प्रकल्प | रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| १. | सामान्य अर्थसंकल्प | रू. ६८६८.४६ |
| २. | गृहनिर्माण | रू. ३२५१.३८ |
| ३. | मेट्रो | रू. ६२५.४८ |
| ४. | पाणी पुरवठा | रू. ११२०.५० |
| ५. | रेल्वे | रू. ६५३.६३ |
| ६. | नैना | रू. ५२७.१३ |
| ७. | नवी शहरे | रू. १०७३.४२ |
| | **एकूण** | **रू. १४,१२०** |

## दुखवटा

### मनोहर दिघे



**मुरुड :** मनोहर गजानन दिघे उर्फ नाना दिघे(वय ९१ वर्षे) यांचे दि .३ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले . सीकेपी समाज , भोगेश्वर देवस्थान ट्रस्ट , सेवा निवृत्त संघटना आदी संस्थांवर ते अखेर पर्यंत कार्यरत होते . त्यांच्या पश्चात २ मुले१, मुलगी , सुना , नातवंडे असा परिवार आहे .

# रयत शिक्षण संस्था व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे राज्यपालांकडून कौतुक

## महाराष्ट्र राजभवन येथे राजस्थान व ओडिशा राज्य स्थापना दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



देशातील लोकांमध्ये एकी नसल्यामुळे विदेशी शासकांनी आपल्यात फूट पाडून देशावर अनेक शतके राज्य केले. राज्यांनी परस्परांच्या संस्कृती परंपरेचा आदर केल्यास लोकांमधील एकात्मता वाढेल व सर्वांनी एकदिलाने राष्ट्रासाठी योगदान दिल्यास 'एक भारत श्रेष्ठ भारत' निर्मितीचे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी (दि. ४) मुंबईत केले.

राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली राजस्थान आणि ओडिशा या दोन राज्यांचा राज्य स्थापना दिवस महाराष्ट्र राजभवन मुंबई येथे संयुक्तपणे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य व लोकगीतांच्या माध्यमातून राजस्थान व ओडिशा राज्यांच्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.केंद्र शासनाच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राजभवनातर्फे या राज्य स्थापना दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रोव्होस्ट तथा संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, कुलगुरु डॉ. ज्ञानदेव म्हस्के, राज्यपालांचे उपसचिव एस राममूर्ती तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अवघ्या काही हजार ब्रिटिशांनी देशातील लोकांमध्ये फूट पाडून करोडो लोकसंख्या असलेल्या आपल्या देशावर अनेक दशके राज्य केले. आगामी काळात प्रगतीची शिखरे सर करण्यासाठी देशात एकात्मता टिकून राहणे आवश्यक असून एकतेमुळे देशाचे जगातील स्थान उंचावले असल्याचे राज्यपालांनी सांगितले. राजस्थान व ओडिशा राज्यांचे देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात देखील महत्वाचे योगदान आहे. ओडिशाचे सुपुत्र शेलेंद्र यांनी इंडोनेशियातील जावा, सुमात्रा येथवर राज्यविस्तार केला होता. ओडिशात जन्मलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान अनन्यसाधारण होते असे सांगून एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमामुळे देशातील लोकांना इतर राज्यातील महान नेत्यांचे योगदान समजण्यास मदत होत आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

या वेळी दोन्ही राज्यांचा इतिहास, सौंदर्य, वारसा, कला संस्कृती आणि पर्यटन स्थळे दर्शविणारे लघुपट दाखवण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राजस्थानी लोकगीते केसरिया आणि झिरमीर बरसे आणि लोकनृत्य चिरामी, घूमर आणि कालबेलिया सादर केले. राजस्थानी राज्यगीत 'पधारो म्हारो देस' ने उपस्थितांची माने जिंकली तसेच ओडिशातील लोकगीते संबलपुरी गीत– 'रसरकेली बो' आणि लोकनृत्य – संभलपुरी ढलकाई सादर करण्यात आले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रोव्होस्ट चंद्रकांत दळवी तसेच विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# पनवेल महापालिकेचे वैद्यकीय क्षेत्रातील पर्यटन वाढविण्यासाठी प्रयत्न

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचनेनूसार वैद्यकिय क्षेत्रातील पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने धोरण व रोडमॅप ठरविण्यासाठी नुकतीच मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पालिका कार्यक्षेत्रातील प्रमुख रूग्णालयांच्या प्रतिनिधींची बैठक उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या वेळी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी डॉ. सुरेश पंडित, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, साथरोग अधिकारी डॉ. आकाश ठसाळे अधिकारी व कर्मचारी तसेच मित्र रूग्णालय, लक्ष्मी आय केअर, मेडिकव्हर, अष्टविनायक रूग्णालय, लाईफ लाईन रूग्णालय, मदरहूड रूग्णालय, व्हाईट हाऊस रूग्णालय अशा विविध रूग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालयांना चालना देण्यासाठी व सुशिक्षित तरुणांना रोजगार संधी मिळण्याच्या दृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रात वैद्यकीय पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने त्याला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. मेडिकल टुरिझम अर्थात वैद्यकिय पर्यटनाच्या अनुषंगाने नुकत्याच मुख्यालयात झालेल्या बैठकीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नागरिकांना दर्जेदार व कमी खर्चात आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी व देशविदेशातील विद्यार्थ्यांना वैद्यकिय शिक्षण देण्याच्या दृष्टीने संधी मिळाव्यात यासाठी महानगरपालिका हा उपक्रम राबवित आहे. परराष्ट्रीय गुंतवणुकीसाठीचा हा प्रयत्न आयुक्त या माध्यमातून करत आहेत.

या वेळी वैद्यकीय पर्यटनाच्या दृष्टीने रूग्णालयांना तात्काळ कोणकोणत्या सोयी सुविधा देता येतील याबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये रुग्णालय देत असलेल्या विविध सेवांबाबतची माहिती पालिकेच्या अधिकृत वेबसाईटवर देण्याची उपलब्धता पालिका लवकरच करून देणार असल्याबाबत आश्वासित करण्यात आले तसेच जास्त कालावधीत करता येणाऱ्या उपाययोजनांबाबत चर्चा करताना भविष्यात महापालिका वैद्यकीय पर्यटनाकरिता खास एक वेबसाईट तयार करून याबाबतची जनजागृती करणार असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.

नवी मुंबई विमानतळ सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर तसेच एकूणच महापालिका कार्यक्षेत्रात वैद्यकीय पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने त्याला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिका कार्यक्षेत्रातील विविध रुग्णालयांबरोबर या वेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली.







पनवेल : विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, उपसरपंच किशोर सुरते, ग्रामपंचायत सदस्य अविनाश गायकवाड, प्रल्हाद भोईर, डी.के. भोईर, संजित भिंगारकर, बाबुराव भिंगारकर तसेच यतीन पाटील, हेमंत माने आदींनी शुभेच्छा दिल्या.

## नौदल अधिकाऱ्याला अडीच कोटींचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

शेअर्समधील गुंतवणुकीमध्ये जास्त फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका सायबर टोळीने नौदलातील सेवानिवृत्त अधिकार्याला २ कोटी ४७ लाख ५० हजारांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे.

फसवणूक झालेले ६५ वर्षीय भारतीय नौदलातील सेवानिवृत्त अधिकारी हे खारघरमध्ये राहण्यास आहेत. २५ जानेवारी रोजी सायबर टोळीने त्यांचा मोबाइल नंबर एबीएएनएस प्रो या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये घेतला होता. शेअर मार्केटमध्ये एबीएएनएस 'कंपनीचे मोठे नाव असल्याने या नौदल अधिकार्याने एबीएएनएस या कंपनीमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. सायबर टोळीने त्यांना एक लिंक पाठवून एबीएएनएस प्रो हे अप डाऊनलोड करण्यास सांगितले.

शेअर्समध्ये गुंतवणूक करण्यासाठी सायबर टोळीने त्यांना दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे पाठवण्यास सुरुवात केली. ५ फेब्रुवारी ते २७ मार्च या कालावधीत त्यांच्या बचत खात्यातून तब्बल २ कोटी ४७लाख ५० हजारांची रक्कम पाठवली गेली. त्यानंतर त्यांना एबीएएनएस प्रो या ॲपवरील खात्यात तब्बल ३९ कोटी ४३ लाख ८० हजार रुपये इतका फायदा झाल्याचे दाखवण्यात आले. अधिकार्याने त्यातील ३ कोटी रुपये रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना ही रक्कम काढण्यासाठी १ टक्के रक्कम सर्व्हिस चार्ज भरावी लागेल असे सांगण्यात आले.

मात्र आपल्याकडे रक्कम नसल्याचे सांगितले मात्र सर्व्हिस चार्जेसची रक्कम भरल्यानंतरच रक्कम काढता येईल, असे सांगण्यात आले.` गुगलवरुन एबीएएनएस या कंपनीचा नंबर शोधून त्यावर संपर्क साधला असता, त्यांची सायबर टोळीकडून फसवणूक झाल्याचे सांगण्यात आले.

## विवाहिता बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

राहत्या घरातून देवीचापाडा येथून बांगड्या घेऊन येते असे सांगून एक विवाहिता घराबाहेर पडली ती अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

रुबी गुफरान शेख (२३ रा.वावंजे) असे या महिलेचे नाव असून अंगाने सडपातळ, उंची पाच फुट, केस लांब व काळे, डोळे काळे, चेहऱ्यावर उजव्या गालावर तीळ असून अंगावर काळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, त्यावर काळ्या रंगाचा बुरखा घातलेला आहे. तिला हिंदी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे ०२२–२७४५२४४४ किंवा ९५९४४३४९९९ व सहाय्यक उपनिरीक्षक मनोहर चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेल येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

उपअधीक्षक भूमी अभिलेख, पनवेल कार्यालयात नुकतेच जनता दरबार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात पनवेल शहर व तालुक्यातील नागरिकांची जमीन मोजणी, फेरफार नोंदी, एकत्रीकरण तक्रार अर्ज भूमी अभिलेख कार्यलयाशी संबंधित इतर कामकाजाबाबत नागरिकांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भूमि अभिलेख विभागाकडून नागरिकांच्या कामांबाबत स्वयंस्फूर्तीने तसेच पुढाकार घेऊन कार्यवाही होत असलेने समाधान व्यक्त केले जात आहे. भूमि अभिलेख कार्यालयात जनता दरबारासाठी उपस्थित असलेल्या नागरिकांनी वेळोवेळी नियोजन करणेची अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार गुरुवार दि.०३ एप्रिल रोजी जनता दरबारचे आयोजन करण्यात आले होते. उप संचालक भूमि



अभिलेख कोकण प्रदेश, मुंबई अनिल माने व मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग सुनिल इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली जनता दरबाराचे आयोजन करणेत आले होते. त्यास जनतेने उस्फूर्त प्रतिसाद दिला. तालुक्यातील नागरिकांचे भूमि अभिलेख विभागाशी संबंधित कामे वेळेत आणि जलद गतीने करणेसाठी विशेष प्रयत्न केला जात असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

जनता दरबार भरविल्याबाबत संपत घरत, उमर शेख, पूर्वी मोहिते, विशाल पाटील, चंद्रकला बांठीया, ओवेश तुंगेकर, ॲड.ऐश्वर्या राऊत, मझहर पठाण, प्रसाद परब, गणेश भोईर, बळीराम पांढारे, निखील चौधरी, सचिन ठोंबरे, मंगेश शेलार आणि धनंजय म्हात्रे यांनी येथील कामकाजाबद्दल विविध प्रतिक्रिया देत भूमी अभिलेख कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष कौतुक केले आहे.

जनता दरबार उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील मुख्य अधिकारी प्रदीप जगताप व अधिकारी भूषण त्रिभुवन यांनी खुप चांगल्या पद्धतीने सहकार्य केले व कार्यालयातील अधिकार्यांकडून मला चांगली वागणूक मिळाल्याचे ओवेश तुंगेकर यांनी सांगेतले

## अडीच लाखांचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १० मधील, साई विला अपार्टमेंटमध्ये अज्ञात इसमाने दिवसाढवळा घरफोडी करून, घरातून सोन्याचे, चांदीचे दागिनेवर रोख रक्कम असा एकूण दोन लाख ६० हजार रुपयांचा ऐवज चोरी केल्याची घटना घडली आहे.

खारघर सेक्टर १०, साईविला अपार्टमेंटमधील रहिवासी प्रवीण कुमार मांगीलाल चौधरी हे घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात इसमाने चौधरी यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. व घरातील कपाटाचे लॉक तोडून त्यातून रोख रक्कम, सोन्याचा हार व चांदीचे दागिने असा दोन लाख ६० हजार रुपयांचा ऐवज चोरी केला.

## तळोजा औद्योगिक वसाहतीमधील २१ मालमत्तांना अटकावणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच ४१२ कोटी रुपयांचा मालमत्ता कर पालिकेने जमा करुन उच्चांक गाठला असला तरी तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कारखानदारांचा मालमत्ता कर भरण्यास अजूनही विरोध कायम आहे. पालिकेने येत्या दोन महिन्यात तळोजातील लाखो रुपयांचा थकीत कर न भरणार्या २१ मालमत्तांची अटकावणी केल्यानंतरही कारखानदार कर भरण्यास तयार नसल्याने भविष्यात कारखानदार व पालिका प्रशासन यांच्यात सनदशीर मार्गाने संघर्ष होईल असे चित्र आहे.

पनवेल महापालिकेमधील साडेतीन लाख करधारकांपैकी अवघ्या एक लाख एक हजार करधारकांनी कर भरण्यास प्रतिसाद दिला. राज्य शासनानेही अभय योजना पनवेलकरांसाठी जाहीर केलेली नाही.



पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी देवदास पाटील यांच्या घरी वास्तुशांती कार्यक्रमानिमित्त भेट देऊन शुभेच्छा दिल्या. सोबत भाजप अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, यतीन पाटील, महेंद्र गोजे.

## द्रोणागिरी संघटनेतर्फे विविध उपक्रम

**उरण : वार्ताहर**

गुढीपाडवानिमित्त उरण तालुका द्रोणागिरी ,माऊली रिक्षा चालक मालक संघटना वतीने वीर सावरकर मैदान उरण येथे विविध उपक्रम राबविण्यात आले .

श्री सत्यनारायण महापूजा ,ज्या रिक्षाचालकाने २५ वर्षे रिक्षा चालवून जनसेवा केली अश्या १३० रिक्षा चालक मालकांचा पत्नीसह मान्यवरांच्या हस्ते भेट वस्तू देवून सन्मानित करण्यात आले. या वेळी ,माजीनगराध्यक्ष रवी भोईर माजी सरपंच चाणजे जितेंद्र घरत ,चाणजे सरपंच अजय म्हात्रे,माजी नगरसेवक सुजाता



गायकवाड ,सोनाली ठाकूर,नित्यानंद भोईर,सर्व सभासदयांचे सहकार्य मिळाले .

## इसम बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

राहुल नातेश्वर सिंग (३० रा.डेरवली) असे या इसमाचे नाव असून वर्ण सावळा, केस बारीक, उंची ५ फुट ५ इंच, नाक गोलाकार चपटे, बांधा मध्यम, शिक्षण १० वी असून अंगात मरुन रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, पायात सफेद रंगाचे बुट असून त्याला हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे ०२२–२७४५२४४४ किंवा ९५९४४३४९९९ व पो.ना.नितीन डगळे यांच्याशी संपर्क साधावा.

## संपादकीय

# बेपर्वाई कशी रोखायची?

प्रसुतीसाठी वेळेत दाखल करून न घेतल्याने उपचारांना विलंब होऊन नवजात जुळ्या बाळांची आई जीव गमावून बसली, या वृत्तामुळे पुण्यातील नामवंत रुग्णालयाविरोधात लोकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित रुग्णालयाने गर्भवतीच्या नातेवाईकांचे हलगर्जीपणाचे आरोप फेटाळले असले तरी, रुग्ण अत्यवस्थ असताना पैशासाठी रुग्णालयांकडून वरचेवर दाखवल्या जाणाऱ्या बेपर्वाईविरोधातील चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे.

**एखादी गर्भवती प्रसुतीसाठी रुग्णालयात जाते, तेव्हा तिच्या मनात गर्भारपणाची नऊ महिन्यांची प्रतिक्षा संपुष्टात आल्याची भावना असते. बाळंतपणाचे दिव्य डॉक्टरांच्या साह्याने सुखरूप पार पाडून आपण आपले बाळ घेऊन आनंदाने घरी परतू, असे सहजपणे गृहित धरून बहुतेक गर्भवती प्रसुतीच्या वेदना सुरू झाल्यावर शेवटच्या क्षणीच रुग्णालयात दाखल होतात. जुळ्यांचे गर्भारपण असलेल्या गर्भवती व त्यांचे कुटुंबीय थोडी अधिक दक्षता घेतात. नाव आधीच नोंदवलेले असल्याने सहसा दाखल होण्यातही अडचण येत नाही. परंतु पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात मात्र हा घटनाक्रम नेहमीच्या शिरस्त्याने घडला नाही असा आरोप झाला आहे. पुण्यातील भाजपचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनीशा यांना प्रसुती वेदना सुरू झाल्याने नातेवाईकांनी त्यांना मंगेशकर रुग्णालयात नेले. परंतु त्यांच्या गर्भात जुळी मुले असल्याचे ध्यानात येताच त्यांची प्रसुती किचकट असल्याचे सांगत रुग्णालयाने आधी दोन बाळांचे मिळून वीस लाख रूपये जमा करण्याचा आग्रह धरला. भिसे यांनी विनंती केल्यावर रुग्णालयाने वीसऐवजी दहा लाख भरा असे सांगितले. परंतु नातेवाईकांची तयारी जेमतेम अडीच लाख रूपये भरण्याची होती. रुग्णालय दहा लाख रूपये भरण्यावर ठाम राहिल्याने दरम्यान तनीशा यांची प्रकृती गंभीर झाली. नातेवाईकांनी त्यांना दुसऱ्या रुग्णालयात नेले. परंतु उपचारांना उशीर झाल्याने जुळ्या मुलांना जन्म दिल्यानंतर तनीशा यांचा मृत्यू झाला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सुशांत आणि तनीशा यांच्या विवाहाला आठ वर्षे झाल्यानंतर प्रथमच तनीशा आई होणार होती. वैयक्तिकदृष्ट्या त्यांच्या आयुष्यातील ही अतिशय दु:खद घटना आहेच. परंतु रुग्णालयांचा पैशासाठीचा हव्यास आणि बेपर्वाई यामुळे अशा तऱ्हेने प्रकृती गंभीर असलेल्या रुग्णाचा मृत्यू होण्याच्या घटना इथे-तिथे घडतच असतात. पुण्यातील घटनेत गर्भवतीचे पती सत्ताधारी पक्षाच्या आमदाराचे पीए असल्याने या घटनेची 'बातमी' झाली. एरव्ही सर्वसामान्यांच्या बाबतीत अशी घटना घडल्यास तिची इतकी चर्चा होत नाही. परंतु एखाद्या घटनेत रुग्णाच्या नातेवाईकांचा तोल ढळून डॉक्टरांवर हात उगारण्याची वा मारहाणीची घटना घडल्यास मात्र संघटित डॉक्टर मंडळी तातडीने आंदोलनाचे हत्यार उपसतात. रुग्णांची संघटना नसल्याने त्यांच्या वतीने आरोग्यक्षेत्रातील आर्थिक लूट, मुजोरी व हलगर्जीपणाचा मुद्दा कुणी व कसा मांडायचा असा प्रश्न विचारला जातो आहे. आरोग्यक्षेत्रातील गैरप्रकारांविषयी लोक समाजमाध्यमांवर संताप व्यक्त करत आहेत. रुग्ण अत्यवस्थ असतो तेव्हा थोडी रक्कम घेऊन तातडीने उपचार सुरू करणे रुग्णालयांचे कर्तव्य नसते का, असा प्रश्न विचारला जातो आहे. खाजगी रुग्णालयांतील चढ्या दरांवर कुणाचे नियंत्रण असते हाही प्रश्न आहेच. तेथील निष्णात डॉक्टरांची तज्ज्ञता निव्वळ पैशाअभावी गरीब रुग्णांपासून दूर राहते, त्याचे काय? सर्वसामान्य अजुनही डॉक्टरांना देव मानतात. लोकांच्या मनात ही भावना टिकवायची असल्यास वरील प्रश्नांचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.**

# समाजसुधारक पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाई या भारताच्या इतिहासातील एक महान समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि स्त्री-हक्कांच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी कर्नाटक राज्यातील गंगामूल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे होते, जे संस्कृत पंडित होते. त्यांनी आपल्या कन्येला लहानपणापासूनच शिक्षण दिले. त्या काळात स्त्रियांना शिक्षण मिळत नसे, मात्र रमाबाई यांना त्यांच्या वडिलांमुळे वेद-उपनिषदे व संस्कृत ग्रंथांचे ज्ञान मिळाले.



**शिक्षण आणि समाजसुधारक प्रवास**

पंडिता रमाबाई यांना लहानपणीच आई-वडिलांचा आणि नंतर भावाचाही मृत्यू झाल्यामुळे त्यांनी मोठ्या संकटांचा सामना केला. त्यांनी आपले जीवन शिक्षणप्रसार आणि स्त्रीसक्षमीकरणासाठी वाहून घेतले. त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांना पंडिता आणि सरस्वती ही बिरुदे लाभली. त्या भारतातील पहिल्या स्त्रीपैकी एक होत्या, ज्यांनी स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे, असे ठामपणे मांडले.

त्या काळात विधवांचे जीवन अत्यंत हलाखीचे होते. समाजात विधवांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात त्यांनी आवाज उठवला. त्यांनी इंग्लंड आणि अमेरिका येथे जाऊन स्त्रियांच्या शिक्षणाबाबत अध्ययन केले आणि भारतात सुधारणा घडवण्याचा निश्चय केला.

**शारदा सदन आणि स्त्रीशिक्षण**

१८८९ साली पंडिता रमाबाई यांनी पुण्यात शारदा सदन या संस्थेची स्थापना केली. ही संस्था विशेषतः विधवा आणि निराधार महिलांसाठी होती. येथे त्यांनी स्त्रियांना शिक्षण आणि स्वावलंबनाचे धडे दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक स्त्रिया शिक्षित झाल्या आणि स्वातंत्र्याने आपले जीवन जगू लागल्या. यानंतर, त्यांनी मुंबईत आर्य महिला समाज स्थापन केला, जो हिंदू विधवांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत होता. तसेच त्यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रातील अनेक भागांत महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे कार्य केले.

**लेखन कार्य**

पंडिता रमाबाई यांनी आपल्या जीवनप्रवासावर आधारित अनेक ग्रंथ लिहिले. त्यांचे स्त्रीधर्म-नीति आणि द हाय कास्ट हिंदू वुमन हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांमध्ये त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि सामाजिक स्थितीच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला. त्यांच्या लेखनामुळे जागतिक स्तरावर भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीची जाणीव निर्माण झाली.

**योगदान आणि वारसा**

पंडिता रमाबाई यांनी आपले संपूर्ण जीवन स्त्रिया आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. ५ एप्रिल १९२२ रोजी त्यांचे निधन झाले, पण त्यांचे कार्य आजही अनेक सामाजिक संस्था आणि शिक्षणप्रेमी पुढे नेत आहेत. त्यांचे योगदान भारतीय स्त्रीसक्षमीकरणाच्या इतिहासात अजरामर राहील.

पंडिता रमाबाई यांनी प्रतिकूल परिस्थितीतही समाजसुधारणेची चळवळ पुढे नेली. त्यांनी शिक्षण, विधवा पुनर्वसन आणि स्त्री-हक्कांसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतीय स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज भारतीय महिलांना शिक्षण आणि समान हक्क मिळाले आहेत. (साभार : चॅट जीपीटी)

# शेततळे : शाश्वत सिंचनाचा राज्यातला नवा अध्याय

जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या प्रयत्नातून राज्यातील पहिल्या पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. वाघूर उपसा जलसिंचन योजनेंतर्गत २७ गावांमध्ये २०२० शेततळी बांधण्यात येणार असून, त्यात वाघूर धरणाचे पाणी साठवले जाणार आहे. हा प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार असून, शाश्वत सिंचन सुविधेसोबत भू-जल पातळी सुधारण्यासदेखील मदत करेल.



**शाश्वत सिंचन व्यवस्था**

शेततळ्यांमुळे परिसरातील शेतकऱ्यांना बारमाही पाणीपुरवठा उपलब्ध होईल. यामुळे पारंपरिक तसेच आधुनिक सिंचन पद्धती (ठिबक आणि तुषार सिंचन) वापरणे शक्य होईल.

**जलसंधारण आणि पाणीबचत**

शेततळ्यातील पाणी ठिबक आणि तुषार सिंचनासाठी वापरल्यास पाण्याचा कार्यक्षम उपयोग होईल आणि जलसंधारणास चालना मिळेल.

**शेती उत्पादनात वाढ**

नियोजनबद्ध सिंचनामुळे शेतकरी वर्षभर विविध पिके घेऊ शकतील. परिणामी, उत्पादन आणि उत्पन्न दोन्ही वाढेल.

स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना

शेततळ्यामध्ये मत्स्यपालन केल्यास शेतीपूरक जोडधंदा उपलब्ध होईल. व्यवसाय बळकट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही गती मिळेल.

**वाघूर उपसा जलसिंचन योजनेचा विस्तार**

वाघूर उपसा जलसिंचन योजना क्र. १ आणि २ सध्या कार्यान्वित असून या योजनेतून १९,१३२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

योजनेंतर्गत गाडेगाव, जामनेर आणि गारखेडा या तीन शाखांमधून १०,१०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. २७ गावांमध्ये २,०२० शेततळे बांधण्याचे उद्दिष्ट असून, त्यापैकी २१० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. गाडेगाव शाखेतील गाडेगाव, नेरी बुद्रुक, नेरी दिगर, चिंचखेडा, करमाड व पळासखेडा येथे ७० शेततळ्यांमध्ये पाणी साठवण्यास सुरुवात झाली आहे. सध्या ९०% पाइपलाईनचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे लवकरच पूर्ण होणार आहेत. आतापर्यंत १,१८९ शेततळ्यांचे करारनामे पूर्ण झाले आहेत.त्यातील २१० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत.

**सिंचन सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध**

प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी शासन देखील कटीबद्ध आहे.जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली जलसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. या प्रकल्पाची गती वाढवण्यावर भर दिला जात आहे.

वाघूर उपसा सिंचन योजनेंतर्गत शेतकरी संवाद बैठका विविध गावांमध्ये घेण्यात आल्या. प्रांताधिकारी विनय गोसावी यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. शेततळ्यांबाबत शंका-निरसन बैठक आयोजित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. उर्वरित करारनामे तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

**जलसंधारणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल**

गोंडखेल येथील शेततळे हा केवळ जलसंधारण प्रकल्प नसून तो ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या भविष्याला दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रकल्पामुळे शेतीसाठी आवश्यक जलसाठवण क्षमता वाढेल. भू-जल पातळी सुधारेल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. जलसंधारण आणि आधुनिक सिंचनाच्या मदतीने जळगाव जिल्ह्यातील शेती अधिक समृद्ध होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

-माहिती व जनसंपर्क महासंचालनालय



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल ते सॅटेलाइटपर्यंत सोन्याचा होतो वापर

सोन्याचा वापर आपल्याकडे फक्त महिलाच करतात. अनेक जण सोन्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात, पण सोन्याचा वापर तुम्ही वापरत असलेल्या मोबाईल, लॅपटॉप यामध्ये केला जातो. सोने हे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञान उद्योगासाठीदेखील खूप महत्वाचे आहे. उपग्रहांपासून स्मार्टफोनपर्यंत अनेक ठिकाणी सोन्याचा वापर केला जातो.



स्मार्टफोनच्या सर्किट बोर्ड, कनेक्टर आणि प्रोसेसरमध्ये सोन्याचा वापर केला जातो. लॅपटॉप आणि कॉम्प्युटरच्या मदरबोर्ड, रॅम मॉड्युल आणि सीपीयूमध्ये सोन्याचा वापर केला जातो. टॅबलेट आणि आयपॅडच्या कनेक्टर आणि इंटीग्रेटेड सर्किटमध्ये सोन्याचा वापर केला जातो.

टेलिव्हिजन सेटच्या सर्किट बोर्ड आणि कनेक्शन पॉइंट्समध्ये सोन्याचा वापर केला जातो. डिजिटल कॅमेऱ्यांच्या अंतर्गत सर्किट्स आणि कनेक्टर्समध्ये खूप कमी प्रमाणात सोने वापरले जाते, पण या उपकरणांमध्ये सोनं कमी प्रमाणात वापरले जाते.

संगणक हार्डवेअरमध्ये अनेक ठिकाणी सोन्याचा वापर केला जातो. मदरबोर्डच्या आत सोन्याचा मुलामा असलेल्या पिन आणि कनेक्टरमध्ये सोन्याचा वापर केला आहे. सीपीयूच्या आत सोन्याचा मुलामा असलेल्या पिनमध्ये देखील वापरले जाते.

मोबाईल नेटवर्क टॉवर्समधील उच्च-फ्रिक्वेन्सी कनेक्टरमध्ये सोन्याचा वापर केला जातो. उपग्रह संप्रेषण उपकरणांच्या रिसीव्हर आणि अँटेनामध्ये सोन्याचा वापर केला जातो.

वैद्यकीय उपकरणांमध्ये सोने वैद्यकीय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या अनेक उपकरणांमध्ये सोन्याचा वापर केला जातो. यामध्ये पेसमेकर आणि डिफिब्रिलेटरचा समावेश आहे. श्रवणयंत्रांमध्येही सोन्याचा मुलामा असलेले कनेक्टर वापरले जातात. सोन्याचा वापर उच्च संवेदनशील सर्किटमध्ये केला जातो.

सोने हे विजेचे चांगले वाहक आहे आणि ते गंजत नाही. विद्युत सिग्नल प्रसारित करू शकते. सर्व हार्डवेअरमध्ये जलद संवाद साधण्यासाठी सर्किट बोर्ड, कनेक्टर आणि मायक्रोचिप्समध्ये सोन्याचा वापर केला जातो.

अंतराळयान हे एक महागडे वाहन आहे. येथे सोन्याचा वापर वीज वाहक म्हणून आणि अनेक आवश्यक वायरिंगमध्ये केला जातो.

# बॉलीवूड अभिनेत्री दिव्या भारती

दिव्या भारती ही एक भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री होती जिने प्रामुख्याने हिंदी आणि तेलुगु चित्रपटांमध्ये काम केले. ती तिचा अभिनय, अष्टपैलु व्यक्तिमत्त्व आणि सौंदर्यासाठी ओळखली जाणारी तसेच त्याकाळातील सर्वात लोकप्रिय आणि सर्वाधिक मानधन घेणारी भारतीय अभिनेत्री होती.



## निमित्त

भारतीने आपल्या अभिनयाच्या कारकिर्दीची सुरुवात किशोरवयात केली होती. तेव्हा ती पिन-अप मॉडेलिंग असाइनमेंट करत होती. तिने सर्वप्रथम तेलुगू भाषेतील साहसी प्रणयपट 'बॉबिली राजा' (१९९०) मध्ये वेंकटेश सोबत मुख्य भूमिकेतून भारतीय चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर आर्थिकदृष्ट्या अयशस्वी ठरलेल्या तामिळ भाषेतील 'निला पेन्ने' (१९९०) चित्रपटात तिने दुसरी भूमिका केली. 'ना इलेना स्वर्गम' (१९९१) आणि 'असेंब्ली राउडी' (१९९१) या दोन तेलुगू चित्रपटांमध्ये तिने छोट्या भूमिका केल्या होत्या. भारतीला तिचे पहिले व्यावसायिक यश तेलुगू विनोदी प्रणयपट 'राउडी अल्लुडू' (१९९१) मध्ये मिळाले.

तेलुगू चित्रपटांमध्ये काम केल्यानंतर, तिने १९९२मध्ये हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि हिंदी साहसपट 'विश्वात्मा' (१९९२)द्वारे तिच्या बॉलीवूड मधील अभिनयाच्या कारकिर्दीस सुरुवात केली. १९९२मध्ये आलेला हिंदी चित्रपट 'शोला और शबनम' हा बॉक्स ऑफिसवर हिट ठरला आणि तिच्या कारकिर्दीत एक मैलाचा दगड ठरला. तिने 'दीवाना' या प्रणयपटात भूमिका करून स्वतःला सिद्ध केले. या भूमिकेसाठी तिला सर्वोत्कृष्ट महिला पदार्पणाचा फिल्मफेर पुरस्कार मिळाला.

दिव्या भारतीचा जन्म २५ फेब्रुवारी १९७४ रोजी मुंबई येथे ओम प्रकाश भारती आणि मीता भारती यांच्या पोटी झाला. तिला कुणाल नावाचा एक धाकटा भाऊ आणि सावत्र बहीण पूनम होती. पूनम ही ओम प्रकाश भारतीच्या पहिल्या पत्नीपासून झालेली मुलगी होती. हिंदी चित्रपट अभिनेत्री कायनात अरोरा ही तिची चुलत बहीण आहे. दिव्या अस्खलितपणे हिंदी, इंग्रजी आणि मराठी बोलत असे. तिच्या सुरुवातीच्या काळात ती तिच्या नटखट व्यक्तिमत्त्वासाठी आणि कोमल बाहुलीप्रमाणे दिसण्यासाठी ओळखली जात होती. तिने मुंबईतील जुहू येथील मानेकजी कूपर हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. तिने इयत्ता नववीत असतानाच अभिनयाच्या कारकिर्दीस सुरुवात केली होती.

तिच्या मृत्यूच्या काही काळ आधी दिव्याने रंग आणि शतरंजचे चित्रीकरण पूर्ण केले होते; हे अनुक्रमे ७ जुलै १९९३ आणि १७ डिसेंबर १९९३ रोजी मरणोत्तर प्रसिद्ध झाले आणि त्यांना मध्यम यश मिळाले. तिचा अपूर्ण तेलुगू चित्रपट थोली मुद्दू हा अभिनेत्री रंभाने अंशतः पूर्ण केला होता. हा चित्रपट ऑक्टोबर १९९३ मध्ये प्रदर्शित झाला.

५ एप्रिल १९९३ रोजी संध्याकाळी उशिरा भारती बॉम्बेमधील वर्सोवा, अंधेरी पश्चिम येथील तुलसी बिल्डिंग्समधील तिच्या पाचव्या मजल्यावरील अपार्टमेंटच्या बाल्कनीच्या खिडकीतून पडली. जेव्हा तिचे पाहुणे नीता लुल्ला, नीताचा पती श्याम लुल्ला, भारतीची मोलकरीण अमृता कुमारी आणि शेजाऱ्यांना काय घडले हे समजले तेव्हा तिला रुग्णवाहिकेत कूपर हॉस्पिटलच्या आपत्कालीन विभागात नेण्यात आले, जिथे तिचा मृत्यू झाला. ती १९ वर्षांची होती. तिच्या मृत्यूचे अधिकृत कारण डोक्याला गंभीर दुखापत आणि अंतर्गत रक्तस्त्राव हे होते. ७ एप्रिल १९९३ रोजी मुंबईतील विलेपार्ले स्मशानभूमीत तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पॅनिक अटॅक आल्यावर नियंत्रण कसे मिळवायचे?

काही लोकांना भीती किंवा चिंता केल्याने पॅनीक अटॅक येतो. पॅनिक अटॅक पूर्णपणे अचानक येतो. याची आधी कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. यामध्ये श्वास घेण्यास त्रास होणे, मूर्च्छित होणे, हृदयाचे ठोके वाढणे, स्नायूंमध्ये क्रॅम्प्स येऊ लागतात. पॅनिक अटॅकमुळे होणारे शारीरिक परिणाम काही मिनिटांपासून अर्ध्या तासापर्यंत राहतो. अशा परिस्थितीत जेव्हा तुम्हाला पॅनिक अटॅक येत असेल तेव्हा स्वतः वर नियंत्रण कसे ठेवावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.



पॅनिक अटॅकची शारीरिक लक्षणे : पॅनिक अटॅकमुळे घाम येणे, थंडी वाजणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा घसा कोरडा होणे. त्याच वेळी काही लोकांना मूर्च्छा येणे, गरम चमकणे, पोटदुखी, छातीत दुखणे, डोकेदुखी, चक्कर येणे अशा समस्या जाणवतात. अनेक वेळा पॅनीक अटॅकमुळे हात-पाय थरथर कापल्यासारखं वाटतं. मरणाची भीती वाटते. अशा वेळी स्वतःवर नियंत्रण ठेवण्याचे तंत्र अवगत असले पाहिजे.

खोल श्वास घेण्याचा सराव करा : खोल आणि हळू श्वास घेण्यावर लक्ष केंद्रित करा. नाकातून श्वास घ्या, चार मोजा आणि श्वास रोखून ठेवा. नंतर एक सेकंद थांबा आणि तोंडातून श्वास सोडा. या प्रकारच्या श्वासोच्छवासाचा सराव तुम्हाला तुमच्या जलद श्वासोच्छवासावर नियंत्रण ठेवण्यास आणि मज्जासंस्था शांत करण्यात मदत करेल.

पॅनिक अटॅकपासून सावध रहा : पॅनिक अटॅक आला की लक्षात ठेवा की तो निघून जाईल. फक्त भीती कशी कमी करता येईल हे समजून घेण्याचा प्रयत्न करा.

ऑब्जेक्टवर लक्ष केंद्रित करा : जर तुम्हाला पॅनिक अटॅक येतोय असं जाणवत असेल तर तुमच्या सभोवतालच्या एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करा. यामुळे तुमचे लक्ष इतर क्रियाकलापांकडे वळेल.

त्या ठिकाणाहून हलू नका : जेव्हा जेव्हा पॅनिक अटॅक येतो तेव्हा त्या ठिकाणाहून दूर जाण्याची चूक करू नका. असे केल्याने भीती वाढते आणि परिस्थिती आणखी बिघडते. जेव्हा तुम्ही त्याच ठिकाणी राहता तेव्हा ते तुम्हाला तुमच्या भावना आणि भीतीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

हलका व्यायाम करा : जर तुम्हाला पॅनिक अटॅक जाणवत असेल तर ताबडतोब चालणे किंवा हलका व्यायाम करणे सुरू करा. यामुळे एंडोर्फिन हार्मोन्स बाहेर पडतात आणि मूड बदलतो. त्यामुळे पॅनिक अटॅकची लक्षणे पुढे वाढत नाहीत.

# रायगड जिल्ह्याने मुद्रांक शुल्क वसुलीचे ९२ टक्के उद्दिष्ट केले साध्य

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २०२४-२५ या आर्थिक वर्षात जागा जमिनींच्या व्यवहारातून ३ हजार ५४४ कोटी रुपयांचा महसूल मुद्रांक शुल्काच्या रुपाने जमा झाला आहे. रायगड जिल्ह्याला २०२४-२५ यावर्षासाठी ३ हजार ८५० कोटींचा मुंद्रांक शुल्क वसूलीचे उद्दीष्ट देण्यात आले होते. ९२ टक्के उद्दीष्ट साध्य करण्यात विभागाला यश आले आहे.

अभय योजना आणि उत्तर रायगड मध्ये जागा जमिनींच्या व्यवहारात झालेली वाढ यामुळे महसूलात भर पडली आहे. सन २०२३-२४ मध्ये ३ हजार २०६ कोटी रुपयांचा महसूल मुद्रांक शुल्काच्या रुपाने शासनाला प्राप्त झाले होते. तर २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३ हजार ५४४ कोटींचा महसूल मुद्रांक शुल्कातून जमा झाला आहे. ३३८ कोटींचा अधिक महसूल दस्त नोंदणीतून प्राप्त झाला आहे. त्यामुळे मुद्रांकातून जमा होणाऱ्या महसूलात लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

गेली तीन वर्ष रेडी रेकनरचे दर स्थिर होते. मात्र तरीही जिल्ह्यातील मुद्रांक शुल्कातून मिळणाऱ्या महसूलाचा आखेल चढता राहिला आहे. अटल सेतू, नवीमंबई विमानतळ, जल वाहतूक सेवा यामुळे मुंबईशी रायगड जिल्ह्याची कनेक्टीव्हिटी वाढल्याने, येथील जागा जमिनींना असलेली मागणी वाढली आहे. त्यामुळे जागा खरेदीचे प्रमाण वाढले आहे. ज्याचा एकत्रित परिणाम मुद्रांकातून येणाऱ्या महसूलावर झाला आहे.

पनवेल, कर्जत, खालापूर, उरण, अलिबाग, पेण तालुक्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास क्षेत्रात समावेश करण्यात आला. यामुळे या परिसाराती जागा जमिनीची मागणी वाढली असल्याचे दिसून येत आहे. बांधकाम व्यवसायाशी निगडीत अनेक प्रकल्प या परिसरात येऊ लागले आहेत. त्यामुळे मुद्रांक शुल्क वसुलीला मोठा हातभार लागला असल्याचे सांगितले जात आहे.

# पोलादपूर नगराध्यक्षपदी शिल्पा दरेकर यांची बिनविरोध निवड

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीच्या सातव्या नगराध्यक्षा म्हणून शिल्पा दरेकर यांची बिनविरोध जाहिर झाली. या निवडीनंतर शिल्पा दरेकर यांची आगामी केवळ सहा महिन्यांच्या कालावधीसाठी निवड शिवसेना पक्ष संघटनेने करण्याचा निर्णय घेतल्याने उर्वरित दीड वर्षात अजून दोनवेळा नगराध्यक्षांची निवड होणार आहे

निवडणूक पिठासीन अधिकारी यांच्याकडे दाखल करताना शिल्पा देवेंद्र दरेकर यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शहरप्रमुख सुरेश पवार व सर्व शिवसेना व भाजप महायुतीच्या नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते.

प्रारंभी नगरपंचायत कार्यालयात स्वच्छता दूत स्वर्गीय नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून वंदन केले.पोलादपूर नगरपंचायत कार्यालयात महाडचे प्रभारी प्रांताधिकारी संदिपान सानप यांचे स्वागत प्रभारी नगराध्यक्ष तथा विद्यमान उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले यांनी मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्या उपस्थितीत केले.यानंतर अधिकृतपणे शिल्पा देवेंद्र दरेकर यांची नगराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली.




# नेरळमध्ये उद्या आगरी वधू-वर केंद्राचे उद्घाटन

**कर्जत: प्रतिनिधी**

आगरी समाजातील तरुणांची लग्ने जमवून देण्यात महत्वाची असलेल्या आदर्श आगरी समाज मंडळ यांची नेरळमध्ये बारावी शाखा सुरू होत आहे.

आदर्श आगरी युवक मंडळाच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यात वधू वर सूचक मेळावे भरवून लग्न जुळविण्याचे काम होते. या संस्थेच्या ठाणे जिल्ह्यात ११ शाखा असून आता कर्जत तालुक्यात नेरळ येथे १२ वी शाखा सुरू होत आहे. नेरळ येथील समाजाचे कार्यकर्ते प्रकाश गवळी आणि पूनम गवळी या दांपत्याने आदर्श आगरी युवक मंडळाचे केंद्र उघडण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मातोश्री नगर भागात हे वधू वर सूचक केंद्र सुरू होत आहे. कर्जत तालुक्यातील आगरी समाजाच्या पहिल्या वधू वर सूचक केंद्राचे उद्घाटन आगरी समाज संघटनेचे नेते सावळाराम जाधव, नागो गवळी, शिवराममहाराज तुपे आणि रमेश म्हसकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिल **१) श्री. हरमीत सिंघ साहनी व २) सौ. हर्नाझ कौर** हे खालील वर्णन केलेली मिळकत **मे. शाह ग्रुप बिल्डर्स लिमिटेड** यांच्याकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा करार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**प्लॉट नंबर ९८, सेक्टर नंबर २०, खारघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, क्षेत्र १५० चौ. मी या वर बांधीव तळ व ३ मजले त्यांचे क्षेत्र १४६.७६ चौ.मी.**

पनवेल.
दिनांक : ०५/०४/२०२५.

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्पेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
फोन ९८३३६३९२०६


# रेवदंडा बाजारपेठेत नित्याची वाहतूक कोंडी!

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेत बेशिस्तीने केलेल्या लहान मोठया वाहनांच्या पार्किगने नित्याने वाहतुक कोंडी निर्माण होते, त्यामुळे पार्किगच्या असुविधेने रेवदंउा बाजारपेठेतील वाहतुक कोंडीची समस्या ऐरणीवर असते. अलिबाग,मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून वाहनांची जा-ये मोठया प्रमाणात आहे, विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस असल्याने येथून पर्यटक मोठया प्रमाणात येत असतात, त्यांना रेवदंडा मार्गेच मुरूडकडे जा-ये करावी लागते. रेवदंडा बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये वसलेली आहे, या बाजारपेठेतील रस्ता अंत्यत अंरूद आहे . त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा ताण रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला नेहमीच असतो.रेवदंडा बाजारपेठेतील अगोदरच अरूंद असलेल्या रस्ता वाहनांची जा-ये करताना नित्याने वाहने व प्रवासीवर्गाला वाहतुक कोडींच्या समस्येला सामोरे जावे लागते. विशेष म्हणजे रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला कुठेही पार्किग सुविधा नसल्याने जा-ये करणारा वाहनांना बाजारपेठेत बेशिस्तीने पार्किग केलेल्या वाहनाचा अडथळा होतो, व वाहतुक कोंडी निर्माण होते.



रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग,मुरूड व रोहा तालुक्यातील गावे, व रेवदंडा पंचक्रोशीतील गावे अवंलबून आहेत, त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्याने गर्दीचे ठिकाण आहे. येथे बाजारपेठेत खरेदीसाठी नित्याची गर्दी असते, बाजारपेठेतील अरूंद रस्तात मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने बेशिस्तीने पार्किग केली जातात, त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याने जा-ये करणार्या मोठया बसेस, मालवाहतुक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो, त्यामुळे वाहतुक कोंडी नित्याने होते. मुख्यः रस्ता अरूंद असल्याने पार्किग समस्या सुध्दा निश्चितच जाणवते. बाजारपेठेतील अरूंद रस्तात पार्किग सुविधा उपलब्ध होत नसल्याने बाजारपेठेत गर्दीच्या वेळी रस्त्यात वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताने दोन मोठी वाहने पास होताना फारच जिकीरीचे असते,शिवाय रस्त्यात उभी केलेली लहान मोठी वाहने वाहनांच्या जा-ये करताना अडथळा निर्माण करतात. या रस्ताने मिनिटागणीत वाहने जा-ये करत असल्याने बेशिस्तीने केलेल्या पार्किगने वाहतुक कोंडी निर्माण होते. रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुल दरम्यान नित्याने वाहतुक कोंडीची समस्या असते. विशेषतः केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका, ते पुढे रेवदंडा हायस्कुल पर्यंत नित्याची वाहतुक कोंडी निर्माण होत असते. रेवदंडा बाजारपेठेतील गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुल या एक किमी अरूंद रस्त्याच्या अंतरामध्ये कुठेही पार्किग सुविधा नसल्याने ही वाहतुक समस्या निर्माण होते. रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद असलेल्या रस्ताला पार्किग सुविधा नसल्यानेच वाहतुक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते, बाजारपेठेत खरेदी साठी मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने येत असतात, त्यांना पार्किग सुविधा अत्यंत गरजेची आहे. पार्किग सुविधा नसल्याने बेशिस्तीने वाहने पार्किग करून ठेवल्याने वाहतुक कोंडी निर्माण होते.

बाजारपेठेतील नित्याने होत असलेल्या कोंडीने पोलिसांना सुध्दा डोकेदुखी ठरते, नित्याने येथे ट्रफिक पोलिसांची नित्यांत आवश्यकता असते. या ट्रफिक पोलिसांना रस्त्यात बेशिस्तीने पार्किग केलेली वाहने हटवावी लागतात, त्यावेळी वाहतुक कोंडी सुटते. मात्र तोपर्यंत वाहनांची भली मोठी रांग बाजारपेठेत लागलेली दिसते. रोज व नित्याने रेवदंडा बाजारपेठेत होणारी वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी संबधीताने पार्किग सुविधेचा प्रश्न सोडविणे फारच गरजेचे आहे.


## जाहीर नोटीस

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचा सन २०२४ ते २०२९ या कालावधीतील पंचवार्षीक निवडणुक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत आहे.

संस्थेचे नांव क्यु एन ग्रीन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कोयनावेळे, तळोजा फेज-१, ता. पनवेल, जि. रायगड सदर कार्यक्रमा नुसार नामनिर्देशन पत्र स्वीकुती दि. ०७/०४/२०२५ ते ११/०४/२०२५, नामनिर्देशन छाननी दिनांक १२/०४/२०२५, नामनिर्देशन माघारी दिनांक १४/०४/२०२५ ते २८/०४/२०२५ व आवश्यकते नुसार मतदान दिनांक ०४/०५/२०२५ रोजी घेण्यात येईल तपशीलवार निवडणुक कार्यक्रम, निवडणुकी बाबत सुचना व अधिक माहीती संस्थेच्या कार्यालयात व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी पनवेल, पहीला मजला, कृषी उत्पन्न बाजार समीती, सहकार नगर, रायगड बाजार च्या बाजुला पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**(म.ल. दरवडे)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**


## आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिरास खालापुरात प्रतिसाद



**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर शिवसेना शहर व नगरपंचायत यांच्या सौजन्याने कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या ५२व्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिर आयोजित करून गरजू नागरिकांना मोफत उपचार व औषधांचे वाटप करण्यात आले.

नेताजी पालकर सभागृहात झालेल्या या शिबिरास खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन पवार, शिवसेना शहराध्यक्ष पद्माकर पाटील, नगराध्यक्ष रोशन मोडवे, पदाधिकारी, सुरज हॉस्पिटल टीमचे डॉ. आर्यन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विजय देवरे, डॉ. शर्वरी शिंदे, डॉ. पंकज शिंदे व कर्मचारी उपस्थित होते. पवार यांच्या हस्ते श्रीफळ वाढून या महाआरोग्य शिबिराची सुरुवात झाली.

महाआरोग्य शिबिराकरिता खालापूर नगरपंचायतीचे गटनेते किशोर पवार, संपर्कप्रमुख दीपक पाटील, शहर संघटक पुंडलिक लोते, खालापूर समन्वयक हरेश मोडवे, शहर युवासेना अधिकारी अमित जगताप, उपशहरप्रमुख राजू पार्ठे, रोहिदास मिरकुटे, यशवंत जाधव, वासुदेव पाटील तसेच नगरपंचायतीच्या बांधकाम सभापती उज्वला निधी, नगरसेविका मीना वाघमारे, सुनिता पाटील, लता लोते, प्राथमिक केंद्राच्या आशा सेविका नेहा गायकवाड, अंजली गायकवाड, संगीता गायकवाड, लीना पाटील, प्रियांका पानपाटील, धनंजय कदम आदी हजर होते.

शिबिरात एकूण १५९ लाभार्थ्यांनी नोंदणी करून तपासणी करून घेतली तसेच २० नेत्ररुग्णांना ऑपरेशनसाठी सुरज हॉस्पिटल सानपाडा येथे नेण्यात येणार आहे.

# सहज सेवा फाउंडेशनतर्फे सामुदायिक विवाह सोहळा

**खालापूर: प्रतिनिधी**

सहज सेवा फाऊंडेशनच्या वतीने संस्थांपक अध्यक्ष शेखर जांभळे यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधुन दिनांक २ एप्रिल रोजी ३० जोडप्याचा सामुदायिक विवाह सोहळा श्रीराम मंगल कार्यालय,खोपोली येथे आयोजीत करण्यात आला होता

आदिवासी व अन्य विविध समाजातील ३० जोडप्यांचा सामुदायीक विवाह सोहळा खोपोली येथील श्रीराम मंगल कार्यालय या ठिकाणी संपन्न झाला. या विवाह सोहळ्यातील नव वधूवर यांना आशीर्वाद देण्यासाठी महाराष्ट्रातील सहज सेवा फाऊंडेशनचे पदाधिकारी व रायगड जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार व सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी सर्व जोडप्यांना कन्यादान रुपात संसार उपयोगी साहित्य मान्यवरांच्या हस्ते कन्यादान करून भेट देण्यात आल्या. सर्व मान्यवरांनी सहज सेवा फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहज सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराची, उपाध्यक्षा इशीका शेलार, सचिव अखिलेश पाटील, सह सचिव नम्रता परदेशी, खजिनदार संतोष गायकर,महिला संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, खालापूर तालुका प्रमुख मोहन केदार, मार्गदर्शक राजेंद्र फक्के, सल्लागार नरेंद्र हर्डीकर,गणेश राक्षे, दिवेश राठोड,उबेद पटेल, अशोक ठकेकर, तुषार अगरवाल, आशपाक लोगडे,सुमन शर्मा, सागरिका जांभळे,दमण सिंघ, राजेश धोत्रे,सुजाता नायकर, योगिता जांभळे, निहारिका जांभळे,नम्रता परदेशी,वेदा साखरे,मनीषा नरांगळे,साहिल जांभळे,समीर साठे,रुपेश देशमुख,सुनील घावटे,सुहास कुंभार,अक्षय सुर्वे,जयश्री भागेकर,सलमान शेख, पल्लवी पडवळकर,राजेश पाटील,कृष्णा जोशी व पदाधिकारी यांनी अथक मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकी भालेराव पांनी केले.




# महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ०२ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी सोहळ्या करिता जिजामाता समाधी परिसरात तात्पुरता मंडप उभारणे, विविध कामे, जोड रस्ता व इतर कामे करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड | ५८०००००/- | ५९०००/- | ११८०/- | ३ दिवस | वर्ग चार अ व वरील |
| २ | पाचाड येथील कुणबीनगर जवळ हॅलिपॅड बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड जवळ | ४२०००००/- | ४३०००/- | ५९०/- | ३ दिवस | वर्ग पाच व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०३/०४/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०७/०४/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **०८/०४/२०२५** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ १३७७**
**दिनांक : ०२/०४/२०२५**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका / कोवि/२०२५-२०२६/०४**


# मुरूड आगारात नवीन 'लाल परी'चे आगमन लांबणीवर; प्रवाशांमध्ये नाराजी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड आगारात अनेक वर्षांपासून जुन्या -खटारा गाड्यावच कारभार चालत असल्यामुळे या जून्या गाड्यांतून प्रवास करताना प्रवाशांना त्रास होत होता. या जून्या गाड्या मुळे पर्यटक क्षेत्रावर ही परिणाम होत असल्याने स्थानिक व्यावसायिकांकडून या जुन्या एसटीबद्दल नाराजी निर्माण झाली होती.मात्र मुरुड आगारात एक ही गाडी नवीन न आल्याने जुन्या व खटारा गाड्या तुन आजुन प्रवाशांना प्रवास करावा लागत असल्याने नाराजी प्रवाशांनी व्यक्त केला आहे.मुरुड डेपो सोडुन प्रत्येक डेपोला ५ ते १० नविन गाड्या देण्यात आल्या आहेत या १२ टनापेक्षा वजनाने जास्त असल्याने मुरुड आगाराकरिता देण्यात आले नाही..अलीबाग वरुन मुरुड कडे जाण्यासाठी साळाव पुलावर रा.प.बसला १२ टन वजनापर्यंत मंजुरी देण्यात आलेली होती. परंतु नव्याने दाखल झालेल्या बसेसचे वजन असल्याने व प्रवाशासह १६ टन पर्यंत जाऊ शकते.त्यामुळे मुरुड आगारला लालपरी बस देण्यात आलेली आनी

# नमुंमपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचे होणार सर्वेक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत जनहित याचिका क्रमांक १११/२०२२ आणि २०९/२०२३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार नमुंमपा कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करावयाचे आहे. या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील संबधित सर्व प्राधिकरणांची नियोजनात्मक बैठक महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात झाली.



या वेळी अतिक्रमण विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे, सहा. संचालक नगररचना व इतर महानगरपालिका आधिका-यांसह सिडको, एमआयडीसी, जिल्हाधिकारी कार्यालय, वन विभाग, वन-विभाग कांदळवन शाखा यांचे संबधित अधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे नवी मुंबई पोलीस यांचे अधिकारीही उपस्थित होते. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या संपूर्ण हद्दीमध्ये सर्व अनधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण चार महिन्याच्या आत पूर्ण करण्याच्या सूचना विभागांना देण्यात आल्या.

आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व अनधिकृत बांधकामाचे नोडनिहाय सर्वेक्षण करणे, पाहणी अहवाल तयार करणे आणि संबंधित धारकास नोटीसा देऊन सुनावणी घेणे, म्हणणे ऐकणे व अंतिम आदेश पारित करून अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. ह्या सर्व बाबी करत असताना संबंधित विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयाने १३ नोव्हेंबर २०२४ रोजी दिलेल्या निकालातील दिशा निर्देशाचे पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

# मंत्री गणेश नाईक यांच्यामुळे नागरिकांचे प्रश्न सुटले -दशरथ भगत

## वाशी, सानपाड्यात सामाजिक उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

वाशी व सानपाडा येथे विविध सामाजिक कार्यक्रम संपन्न झाले. सामाजिक कार्यकर्ते निशांत भगत, संदीप भगत यांच्या जन्मदिनानिमित्त या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी महापालिका विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका फशीबाई भगत, माजी नगरसेविका वैजयंती भगत, माजी नगरसेविका रुपाली भगत यांच्यासह मुंबईतील भूमिपुत्र व मच्छीमार चळवळीत क्रियाशील असलेले जयेश आकरे, प्रमोद कोळी, नवी मुंबई, ठाणे, बृहन्मुंबई आणि पनवेल परिसरातील सहकार व भूमिपुत्र चळवळीतील कार्यकर्ते आणि वाशीगाव, सानपाडा - सोनखार, जुईनगर तिन्ही प्रभागातील नागरिक हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी दशरथ भगत यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या मिळत असलेल्या पाठिंब्याने जनतेचे प्रश्न सुटत असल्याचे मत व्यक्त केले.



भूमिपुत्र माथाडी कामगार व जनरल कामगार यूनियन, सोनखार स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशन, इच्छापूर्ती सामाजिक विकास मंडळ, इच्छापूर्ती स्पोर्ट्स क्लब, एकविरा रिक्षा चालक मालक संघटना, प्रभात ट्रस्ट, नवी मुंबई स्टुडन्ट अँड युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अनेक सामाजिक व सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले. डॉ. प्रशांत थोरात यांच्या प्रभात ट्रस्टच्या सहयोगाने वाशीगाव येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर व सवलतीच्या दरात चष्मे उपलब्ध, वाशी स्टेशन टॉवर क्र. ४ जवळ रक्तदान शिबीर, मच्छिमार बांधवांना केंद्र सरकारचे बायोमेट्रिक नोंदीत केलेले एनएफडीपी स्मार्ट कार्ड प्रमाणपत्र वाटप, आयुष्यमान भारत योजने अंतर्गत आरोग्य उपचारासाठीचे पाच लाखांचे विमा कव्हरेज असलेले स्मार्ट कार्ड, अधिकाधिक नागरिकांना आयुष्यमान योजनेची नोंदणी व्हावी याकरिता नोंदणी कक्ष, वृक्षारोपण तसेच रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा, विक्रमगड व वाडा तालुक्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना गरजेच्या वस्तूंची भेट हे उपक्रम राबविण्यात आले.

# पनवेलमध्ये ७४५ आजी आजोबांनी दिली परीक्षा

## नवभारत साक्षरता अभियानास प्रतिसाद

**खारघर : प्रतिनिधी**

नवभारत साक्षरता अभियानांतर्गत तालुक्यात आजी आजोबांची विविध शाळांच्या केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. परीक्षेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांनी कौशल्य विकासाबाबत धडे गिरविले. पनवेलमध्ये ७४५ आजी आजोबांनी परीक्षा दिली.

या कार्यक्रमांतर्गत उल्लास अॅपवर नोंदणी झालेल्या निरक्षरांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आली. नातवांच्या शाळेत परीक्षा देण्याची अनुभूती आजोबांना आली. या परिक्षेत दिव्यांगांचाही समावेश दिसून आला. त्यांच्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करण्यात आली.

आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरूकता, बालसंगोपन आणि निरक्षण, कुटुंब कल्याण आदी कौशल्ये विकसित करण्यावर भर देण्यात आला.

१५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित करून देशातील निरक्षर व्यक्तींमध्ये महत्त्वपूर्ण कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने पेपरचे स्वरूप होते. याचा फायदा नवसाक्षरांना मिळणार आहे.

# रयत शिक्षण संस्था रायगड विभागाचा सांस्कृतिक महोत्सव

**वाशी : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचा रायगड विभागीय संस्कृतिक कार्यक्रम शनिवारी संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कुल येथे पार पडला.

प्रतिवर्षी ९ मे ला सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापाक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त ७ व ८ मे रोजी संस्थेच्या पाचही विभागातून विविध संस्कृतिक कार्यक्रम सादर करून त्यांना आदरांजली वाहिली. त्यानिमित्त शुक्रवारी सांस्कृतिक कार्यक्रम निवडीची स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगड विभागातील् फुंडे, रिटघर, पडवळपाडा, पोलादपूर, पिरकोन, वावंजे, पळसपे, जासई, करंजा, नावडे, कामोठे, दापोली, उलवा, गव्हाण व वाशी येथील



विद्यालयातील विदयार्थ्यांनी सहभाग घेतला.

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कुलच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास विनायक सकपाळ पाटील(कला अकॅडमी परीक्षक, कर्मवीर विद्या प्रबोधिनी रयत शिक्षण संस्था सातारा), अमोल बोधे (कला अकॅडमी परीक्षक, कर्मवीर विद्या प्रबोधिनी,रयत शिक्षण संस्था सातारा) मोहन कोंगेरे (सुमित्रा भोसले (प्राचार्य मॉडर्न स्कुल वाशी), बाळासाहेब कारंडे, संतोष गुजर वैभव गावंड यांच्यासह शिक्षक व विदयार्थी उपस्थित होते.

# उरण-नेरूळ रेल्वेमार्गावर सीसीटीव्ही बसविण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

१२ जानेवारी २०२४ ला बहुप्रतिक्षित उरण ते नेरुळ/ बेलापूर ही लोकल सुरू होऊन १४ महिने झाले आहेत. मात्र या परिसरातील रेल्वे स्थानक आणि परिसरातील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सीसीटीव्हीची प्रतिक्षा कायम आहे. उरण ते नेरुळ आणि बेलापूर मार्गावरील लोकलच्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. त्यामुळे सीसीटीव्ही बसविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या मार्गावर महिला विद्यार्थी त्याचप्रमाणे वृद्ध ही प्रवास करीत आहेत. उरण ते खारकोपर या दरम्यात एकूण चार स्थानक आहेत. यात उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा आणि शेमटीखार ही स्थानके आहेत. या स्थानकाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सिडको की रेल्वेची ही समस्या आहे, मात्र नवी मुंबईतील स्थानकांच्या



ठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही हे मध्य रेल्वे कडून बसविण्यात आले आहेत.

उरणच्या लोकल मार्गावरील स्थानकाना सीसीटीव्हीची प्रतिक्षा आहे. उरणच्या स्थानक परिसरात अनेकदा चोरीच्या घटना घडल्या आहेत. उरण परिसरातील सीसीटीव्हीसह अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उरण लोकल मधील प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लवकरात लवकर सीसीटीव्ही बसविण्यात यावेत, अशी मागणी उरणच्या प्रवाशांकडून केली जात आहे. या संदर्भात मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता माहिती घेऊन सांगतो, अशी प्रतिक्रिया दिली.

# डॉ. राजेश कापसे यांच्या 'नायजेरिया' पुस्तकास रोटरी क्लबचा पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नायजेरिया देशात आरोग्य क्षेत्रात काम करण्यासाठी गेल्यावर तेथील आर्थिक, सामाजिक दुर्बलता, विषमता, निसर्ग सौंदर्य याबाबतीत आलेल्या अनुभवांवर आधारित डॉ. राजेश कापसे यांनी लिहिलेल्या 'नायजेरिया' या पुस्तकास रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाउनतर्फे पुरस्कार देण्यात आला.

डिस्ट्रिक गव्हर्नर रोटेरियन शितल शहा, क्लब प्रेसिडेंट चारूदत्त भगत यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. नायजेरियात एक हजार प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करून तिथे मुलभूत गरजा देण्याचा प्रयत्न केला अशी माहिती देताना प्रत्येकाने उपेक्षितांसाठी स्वतःचा थोडा वेळ दिला पाहिजे. गोरगरीब आधार नसलेल्या लोकांसाठी काम केले पाहिजे, असे आवाहन लेखक डॉ. राजेश कापसे यांनी या वेळी केले.

या कार्यक्रमास रोटरी क्लबचे तुषार तटकरी, जितेंद्र बालड, ऋग्वेद कांडपिळे, कल्पेश परमार, मिहीका भगत व इतर मान्यवर उपस्थित होते.




# नेरूळ विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत मे. विक्रम बार ण्ड रेस्टॉरेंट (विक्रमजी म्हात्रे) भुखंड क्र. ३२५, सेक्टर-६, नेरुळ, नवी मुंबई., यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता विनापरवानगी भुखंड क्र.३२५ येथे तळमजल्यावर १०.००मी. द८.००मी. १२.००मी. द २.३मी.या मोजमापाचे पत्राशेड बांधले आहे. तसेच टेरेसवर १२.०० मी. द ७.५०मी. या मोजमापाचे पत्राशेड व टेरेसवर टॉयलेटचे बांधकाम केले आहे

सदर अनधिकृत बांधकामधारकाने नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनहीअनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही

# उरणमधील दिव्यांगांनी दिली दिव्यांगाला मदतीची साथ

**उरण : बातमीदार**

'जावे ज्याच्या वंशी तेव्हा कळे', आणि ज्या समूहाच दुःख त्याच समूहाला कळतं व त्याची जाणीव ही त्यांनाच होते. आणि तोच समूह मदतीला धावून येतं. हेच सिद्ध होतं. याचच एक उत्तम उदाहरण म्हणजे उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांची एकजूट याच एकजुटीमुळे या तालुक्यातील जसखार गावामधील प्रशांत नारायण पारवे हे एक अस्थिव्यंग दिव्यांग आहेत. त्यांची २४ मार्च ला अचानकपणे तब्येत बिघडली. त्यामुळे सुरुवातीला त्यांना द्रोनागिरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु तेथे चांगल्या प्रकारे व्यवस्था नसल्याने त्यांना कळंबोली येथील एम.जी. एम. रुग्णालयात दाखल करण्यात आले. आपल्या सहकार्याला आपण काहीतरी मदत करायला हवी. या हेतूने दिव्यांग सामाजिक संघटना उरणच्या सर्व सदस्यांनी एकमताने पुढाकार घेऊन संपूर्ण उरण



तालुक्यातील दिव्यांगाना मदतीचे आव्हान केले.

मुळातच प्रत्येक दिव्यांग आपले खडतर आयुष्य जगत आहेत. तरीही आपल्या या खडतर आयुष्यातून सहकार्याची भावना दाखवून तालुक्यातील जवळजवळ ४१ दिव्यांग बांधवांनी आपल्याला जमेल तेव्हढी मदत करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. यावेळी दिव्यांग दिव्यांगाच्या मदतीला धावून आले. या मदतीच्या हाकेतून ३५,३०० रुपये एवढी रक्कम जमा झाली. सामान्य माणसांसाठी सदर रक्कम खूप छोटी असेल पण दिव्यांगाने आपल्या खडतर आयुष्यातून आपल्याच सहकार्याला केलेली ही मदत खूप लाख मोलाची आहे.

ही रक्कम दिव्यांग प्रतिनिधींनी प्रशांत पारवे यांच्या पत्नी अर्चना पारवे यांच्याकडे २ एप्रिल रोजी सुपूर्त करण्यात आली. त्या मदत घेण्यास नकार देत होत्या परंतु दिव्यांग बांधवांनी आपला सहकारी लवकर बरा व्हावा आणि त्याच्या रुग्णालयातील खर्चात आपलाही खारीचा वाटा असावा असे मत व्यक्त केले. आपला दादा लवकर व्यवस्थित होऊन पुन्हा आमच्यासोबत यावा हीच अपेक्षा सर्व दिव्यांग बांधवांनी व्यक्त केली. प्रशांत पारवे यांच्या पत्नीने सर्व दिव्यांग बांधवांचे आभार मानले दिव्यांग सामाजिक संघटना उरणच्या मदतीच्या हाकेला सर्व दिव्यांग बांधव एकत्र आले यासाठी संघटनेच्या सर्व सदस्यांनी तालुक्यातील दिव्यांग बांधवांचे आभार व्यक्त केले.

# नवी मुंबईत पाणी देयकही ऑनलाईन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत यंदाच्या वर्षापासून नागरिकांना पाणी देयक ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून सर्व पेंमेंट सुविधेव्दारे ती भरणा करता येणार असल्याची माहिती नवी मुंबई महापालिकेने दिली. त्यासोबतच मालमत्ताकराचे वर्षभराचे एक देयक अदा केले जाणार असून नागरिक वर्षभरात टप्प्याटप्प्याने देयक रक्कम भरू शकतात असे महापालिकेने स्पष्ट केले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात पाणी देयक ऑनलाईन उफलब्ध नव्हते. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. आता हे देयक ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. नागरिकांना सहजपणे आपली



देयके उपलब्ध व्हावी आणि ही देयके ऑनलाईन भरता यावीत यासाठी नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून ऑनलाईन प्रणालीवर विशेष भर देण्यात येत आहे.

ऑनलाईन देयके भरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नवीन ऑनलाईन मालमत्ता संकलन प्रणाली सुरु करण्यात आली. महापालिकेच्या संकेतस्थळाप्रमाणेच स्वतंत्र प कार्यान्वित करुन त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. विविध ऑनलाईन प्रणालीद्वारे नागरिकांना आता त्यांचे कर भरता येत आहेत. या वर्षात सुरू असलेल्या ऑनलाईन रक्कम भरणा सुविधांमध्ये लवकरच भारत बिल पेमंट या यंत्रणेची भर पडणार असून नागरिकांना अत्यंत सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले. त्यासोबतच मालमत्ताकराचे वर्षभराचे एक देयक अदा केले जाणार असून नागरिक वर्षभरात टप्प्याटप्प्याने देयक रक्कम भरू शकतात.

नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत मालमत्ताकर भरावा यासाठी थकीत मालमत्ताकरावरील शास्ती रकमेवर ५० टक्क्यांची सूट देणारी 'अभय' योजना जाहीर करण्यात आली. होती.

# विद्यार्थ्यांनी बनविले २८ हजार बीजगोळे

**नवी मुंबई : बातमीदार**

तेरणा विद्यालय, नेरूळ ह्या शिक्षण संकुलातील पहिली ते सातवी इयत्तेतील १७७ विद्यार्थांना बीजगोळे बनवण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या मदतीने २८ हजार बीजगोळे (सीडबॉल) तयार करून पर्यावरणाविषयी मार्गदर्शन प्रश्न फाउंडेशन मार्फत देण्यात आले.

प्रश्न फाउंडेशन ही संस्था सुरू करणारे विद्यार्थी हे तेरणा विद्यालय ह्या शाळेचे माजी विद्यार्थी असून आपले दैनंदिन दिवसातील काम सांभाळून ही तरुण मंडळी हे सामाजिक उपक्रम राबवत आहेत.



'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असं म्हणत गेली दोन वर्षे प्रश्न फाउंडेशन मार्फत नवी मुंबई, मुंबई, रायगड, पालघर, सातारा, सांगली अशा विविध जिल्ह्यात ३००० पेक्षा जास्त झाडे लावून त्याचं संवर्धन करण्याचं काम यशस्वीरित्या करत असताना प्रश्न फाउंडेशनमार्फत (सिडबॉल) बीजगोळे बनवण्याचा आणि विविध जिल्ह्यातील डोंगराळ भागात ते बीजगोळे टाकून वनराई नैसर्गिकरित्या वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्रश्न फाउंडेशनमार्फत राबवल्या जाणाऱ्या ह्या उपक्रमाबाबत शाळेच्या मुख्यधापिका सौ. मधुवंती काटवडे आणि शिक्षक संतोष खांडगे यांनी सांगितले की प्रश्न फाउंडेशन मार्फत राबवला जाणारा हा उपक्रम पर्यावरण पोषक असून विद्यार्थ्यांना मातीशी जोडणारा हा उपक्रम आम्ही दरवर्षी शाळेत राबवणार आहोत. या उपक्रमाच्या आयोजन आणि नियोजनाची धुरा सांभाळणारे संस्थेचे अध्यक्ष सूरज उत्तम बिडगर ह्यांनी तेरणा विद्यालय, नेरूळ नवी मुंबई शिक्षण संकुलाचे आभार मानले.

येत्या काळात विविध शिक्षण संस्था तसेच सामाजिक संस्थानी ह्या बीजगोळे बनवण्याच्या उपक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

# रब्बी हंगामातील भातशेती बहरणार

## ५५ कोटी खर्चातून होणार माणगाव व रोह्यातील कालवा अस्तरीकरण



**माणगाव : प्रतिनिधी**

काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगाव तालुक्यातील शेतीला सोडण्यात येते. अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यात या कालव्याला मोठया प्रमाणात माती, दगड, गाळ साठतो त्याच बरोबरशेवाळ व झाडे, झुडपे वाढली असून या कालव्याच्या सफाईची कामे पाटबंधारे विभागाला दरवर्षी करावी लागता तसेच अनेक ठिकाणी कालवा नादुरुस्त असल्याने या कालव्याला मोठ्या प्रमाणात गळती लागते. त्यामुळे माणगाव तालुक्यातील शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतात पाणी पोहचत नाही. परिणामी अनेक शेतकरी नाईलाजाने शेतात कडधान्ये पिकवतात. आता ज्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील भाताचे पिक घेण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी आनंदाची बातमी आहे. येत्या दोन वर्षात माणगाव व रोहा तालुक्यातील कुंडलिका डावातीर कालवा व माणगाव तालुक्यातील माणगाव, मोर्बा, अष्टमी या शाखांतील आवश्यकतेनुसार कालव्याचे नव्याने बांधकाम, तर काही ठिकाणी अस्तरीकरण केले जाणार आहे. यासाठी ५५ कोटी रुपये महाराष्ट्र जलक्षेत्र सुधारणा कार्यक्रम अंतर्गत मंजूर झाले असून हे काम लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे माणगाव व रोहा तालुक्यातील रब्बी हंगामातील भातशेतील अच्छे दिन येणार आहेत.

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधारणा कार्यक्रम अंतर्गत कुंडलिका डावातीर कालवा १० किमी अस्तरीकरण करणार यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन बांधकाम करणे व दुरुस्ती करणे या कामासाठी २० कोटी रुपये खर्चून केली जाणार आहेत. तर माणगाव, मोर्बा, अष्टमी या शाखातील माणगाव ९ किमी अस्तरीकरण, मोर्बा ९ किमी अस्तरीकरण, अष्टमी ५ किमी अस्तरीकरण व आवश्यकतेनुसार नवीन बांधकाम करणे यासाठी ३५ कोटी असे मिळून ५५ कोटी रुपये खर्चून या कालव्याची बांधकाम, दुरुस्ती व अस्तरीकरण करण्यात येणार आहे. या कालव्याची ५ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यची क्षमता आहे. सध्या गेले अनेक वर्ष हा कालवा ठिकठिकाणी नादुरुस्त असल्याने गळती लागून पाणी वाया जाते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे भातशेती पिकवण्याचे स्वप्न भंगत आहे.

सध्या १२०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आहे. या कालव्याची बांधकाम व अस्तरीकरण झाल्यास २२०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन सुमारे ३४०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल आणि माणगाव रोहा तालुक्यात भाताचे कोठार म्हणून नवी ओळख निर्माण करील अशी आशा शेतकऱ्यांच्या वाटत आहेत. डाव्या कालव्यातून माणगाव, गोरेगाव, मोर्बा या तीन शाखांच्या परिसरातील शेतीसाठी पाणी सोडण्यात येते. कालव्यात साठलेला गाळ यंत्रांच्या साह्याने दरवर्षी काढण्यात येतो. त्यानंतर भाराव करणे, खांडी भरणे आदी कामेही केली जातात. यंदाच्या वर्षीही पाटबंधारे विभागाने ही कामे हाती घेतली होती. माणगाव तालुक्यातील अनेक शेतकरी भात पीक मोठ्या प्रमाणात घेतात व उर्वरित शेतकरी कडधान्यांची पिके घेतात.

रोहे तालुक्यातील कुंडलिका नदीवर काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ येथे बंधारा बांधण्यात आला आहे. १९७४मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. १९७६पासून प्रत्यक्ष सिंचन सुरू झाले. त्यानुसार बंधाऱ्यातील पाण्याची विभागणी करण्यात आली. औद्योगिक वापरासाठी ४७ दशलक्ष घनमीटर, पिण्यासाठी ६५, सिंचनासाठी ६५ अशी एकशे छप्पन बेचाळीस दशलक्ष घनमीटर इतकी तरतूद करण्यात आली आहे. भिरा येथील टाटा जलविद्युत केंद्रातून वीजनिर्मितीनंतर वर्षाकाठी उपलब्ध होणाऱ्या सहाशे चौसष्ट. सहाशे चौऱ्याणव दशलक्ष घनमीटर पाण्यापैकी १०३ दशलक्ष घनमीटर पाण्याचा सिंचनासाठी वापर होतो. बंधाऱ्यावर डावा आणि उजवा कालवा आहे. माणगाव तालुक्यातील शेतीला डाव्या कालव्यातील पाणी सोडण्यात येते. उजव्या कालव्यातून रोहे तालुक्यातील शेतीला पाणी सोडण्यात येते. दोन्ही तालुक्यांतील सुमारे ७९६३ हेक्टर जमीन ओलिताखाली येते. हे पाणी डिसेंबर ते एप्रिल या कालावधीत सोडण्यात येते. अनेक ठिकाणी कालवा नादुरुस्त असल्याने अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळत नसल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी भातशेतीकडे पाठ फिरवली आहे. हा कालवा दुरुस्ती झाल्यास हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल अशी शेतकऱ्यांना आशा वाटत आहे.

# १०० दिवस कृती आराखड्याची खालापूर तहसीलदारांकडून पाहणी

**चौक : प्रतिनिधी**




राज्य शासनाने जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याची माहिती घेण्यासाठी खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी क्षेत्रीय कार्यालयात भेट देऊन प्रत्यक्ष माहिती घेतली. या वेळी त्यांच्यासोबत निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड व महसूल अधिकारी सानप होते.

क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ जानेवारी रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दृक परिषदेद्वारे मंत्रिमंडळाच्या उपस्थितीत संबोधित केले आहे.

राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे, जेणेकरून नागरी सेवा वेळेत मिळाव्यात. याच धर्तीवर या कृती आराखड्याची पाहणी तहसीलदार अभय चव्हाण यांनी ग्रामीण रुग्णालय चौक, ग्रुप ग्रामपंचायत चौक, ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव, महसूल अधिकारी कार्यालय चौक या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन कामांची पाहणी केली.

शासकीय व निमशासकीय कार्यालयांकरिता आगामी १०० दिवसांमध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, गुंतवणूक प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर केलेल्या कामांची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले.

या वेळी ग्रामीण रुग्णालय चौक येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी सोनावले, डॉ. राजन यादव, महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप, ग्रामपंचायत अधिकारी सचिन कुराडे, अमोल वाघ, तलाठी अक्षय गावडे, सुदर्शन पालवे, कार्यालय कर्मचारी उपस्थित होते.

# कार्ला येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या दुचाकीला अपघातात

### दोघे गंभीर जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली-कर्जत मार्गावर तळवली गावाच्या हद्दीत अर्धवट स्थितीत असलेल्या टोलनाक्याजवळ मोटरसायकल घसरून झालेल्या अपघातात दोन जण जखमी झाले आहेत. अमोल गोडांबे व पूनम मोरे (रा. डोलखांब, मुरबाड) अशी जखमींची नावे आहेत. ते कार्ला येथे एकवीरा यात्रेसाठी चालले होते. जखमींना कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दुसऱ्या अपघातात मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर खोपोली बायपासजवळ ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने पुढील अज्ञात वाहनाला धडक बसली. ट्रक ड्रायव्हर केबिनमध्ये अडकला होता. एक्स्प्रेस वेवरील देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलच्या जवानांनी त्याला सुरक्षितपणे बाहेर काढून उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात दाखल केले आहे.

# डॉ. सतेज म्हसकर यांना पदवी प्रदान

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पुगाव येथील डॉ. सतेज शंकर म्हसकर यांना २९ मार्च रोजी रॉयल कॉलेज ऑफ सर्जन ऑफ इंग्लंडची एफआरसीएस पिडियाट्रिक सर्जरी ही डिग्री रॉयल कॉलेजचे प्रेसिडेंट टिम मिशेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

डॉ. सतेज म्हसकर यांनी युरोपियन बोर्ड ऑफ पिडियाट्रिक सर्जरी अणि युरोपियन बोर्ड ऑफ पिडियाट्रिक युरोलॉजी या दोन डिग्री संपादन केल्या आहेत. परदेशात जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या भारतातील एमबीबीएस, डीएनबी जनरल सर्जरी व एमसीएच पिडियाट्रिक सर्जरी सुपर स्पेशालिटी असे उच्च पदव्या संपादन केल्या आहेत.

या सुयशाबद्दल त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा व कलाक्षेत्रातील मान्यवरांनी व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



# पिटसई शाळेतील विद्यार्थिनींचे एनएमएमएस परीक्षेत यश

**मुरुड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत अशोक लोखंडे विद्यामंदिर पिटसई हायस्कूलमधील विद्यार्थिनींनी सुयश संपादित केले आहे.



या परीक्षेत इयत्ता आठवीमधील स्नेहल गणेश तांदळेकर, अनुष्का चंद्रकांत जगताप व अनुषा सीताराम जगताप या विद्यार्थिनींनी रायगड जिल्ह्यात मेरीट लिस्टमध्ये स्थान मिळवून त्या विद्यार्थिनी शिष्यवृतीसाठी पात्र ठरल्या आहेत. त्यांना इयत्ता बारावीपर्यंत १२ हजार रुपये प्रतिवर्षी असे सलग चार वर्षात प्रत्येक विद्यार्थिनीस ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती स्वरूपात मिळणार आहे. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे, सचिव संजय रेडीज, संस्थेचे पदाधिकारी व मुख्याध्यापक अरुण खुळपे यांनी अभिनंदन केले.

या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी शाळेतील अकिल मुलाणी, संदीप इंगावले, संजय ठमके, भगिनाथ बांगर, रेखा रेडीज यांनी मार्गदर्शने केले. प्राप्त यशाबद्दल सर्व स्तरातून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# वाकणवाडीजवळ विहिरीत पडलेल्या रानडुकरांना जीवदान

**पाली : प्रतिनिधी**


वाढत्या उन्हात पाण्यासाठी वन्यजीवांची भटकंती होत आहे. असेच पाण्याच्या शोधामध्ये सुधागड तालुक्यातील वाकणवाडी गावातील बस स्टॉपजवळील एका जुन्या पडक्या विहिरीमध्ये गुरुवारी (दि. ३) दोन रानडुकरांची पिल्ले पडली होती. वनविभाग, स्थानिक वन्यजीव रक्षक व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांनी रानडुकरांच्या पिल्लांना शिताफिने पकडून सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

वाकणवाडीजवळ विहीर खोल असून विहिरीचे पाणी देखील आटले आहे. त्यामुळे या रानडुकराच्या पिलांना तेथून बाहेर पडणे अशक्य होते. पालीतील वन्यजीव रक्षक शंतनू लिमये यांना रविराज परदेशी यांनी विहिरीमध्ये रानडुकराची पिल्ले पडली असल्याची माहिती दिली.

यानंतर शंतून लिमये व अमित निंबाळकर त्या ठिकाणी गेले मात्र विहीर खोल असल्याने आणि साधन उपलब्ध नसल्याने त्यांनी वनविभाग कर्मचारी संदीप ठाकरे व अविनाश पाटील तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या सदस्यांना बोलावले आणि त्यांनी या रानडुकरांना सुखरूप बाहेर काढले व नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.



# माणगावमध्ये जलतरण तलावाचे भूमिपूजन



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे व तानाजी दळवी यांच्या सहकार्याने ऑलिम्पिकच्या धर्तीवर अत्याधुनिक जलतरण तलाव लवकरच उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यात या शहरातील जलतरणपटू राष्ट्रीय स्तरावर चमकतील आणि माणगावचा नावलौकिक सातासमुद्रापार करतील असा आत्मविश्वास दापोलीचे माजी आमदार संजय कदम यांनी व्यक्त केला.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील प्रस्तावित तलावाच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रस्तावित स्विमिंग पूल शाळेतील विद्यार्थी तसेच माणगावमधील जलतरणपटू यांनाही उपलब्ध होणार आहे. अशा प्रकारचा जलतरण तलाव जवळपास कोठेही नसल्याने याचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आमदार संजय कदम यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले की, मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच जलतरण तलाव लवकरच उपलब्ध करून देत आहोत. ही शाळा येत्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न करणार आहोत. या जलतरण तलावामध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून इतरही खेळांना प्रोत्साहन आणि प्राधान्य देण्यात येणार आहोत. येथील जलतरणपटूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर जलतरणपटू अभिनंदन दळवी प्रशिक्षण देणार आहेत. याचबरोबर या वर्षी नर्सिंग कॉलेज सुरू करणार आहोत.

# मध्य रेल्वेची उल्लेखनीय आर्थिक कामगिरी

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मजबूत आर्थिक शिस्त आणि वचनबद्धता दाखवली आहे, ज्यामुळे विविध प्रमुख कामगिरी निर्देशकांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

महसूल वाढ आणि खर्च कार्यक्षमतेमध्ये कार्यक्षम कामकाज आणि महत्त्वाचे खर्च नियंत्रण उपायांमुळे महसूल खर्चातील वाढ मागील वर्षाच्या तुलनेत केवळ ५.१८%पर्यंत मर्यादित राहिली. भांडवली खर्चाचे केंद्रित निरीक्षण, ज्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत ९.८४% वाढ झाली. एकूण उत्पन्नात १.८३%ची स्थिर वाढ दिसून आली.

पायाभूत सुविधांमध्ये विक्रमी गुंतवणुकीमध्ये पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देत भांडवली खर्चात २०,८९४ कोटी रुपयांची गुंतवणूक केली, जी मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ९.८४% वाढ नोंदवते. प्रमुख क्षेत्रांमध्ये खर्चात लक्षणीय वाढ यामध्ये गेज रूपांतरण: गेल्या वर्षीपेक्षा ४९% जास्त, वाहतूक सुविधा: ५४%ने वाढ, पुलाचे बांधकाम: ८६% वाढ झाली आहे.

ग्राहक सुविधेमध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये ६७९ कोटी रुपयांच्या तुलनेत १,२५० कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक, जी ५७१ कोटी रुपयांची वाढ दर्शवते. या कामगिरीमुळे मध्य रेल्वेची कार्यक्षमता, आर्थिक सावधगिरी आणि प्रवासी-केंद्रित पायाभूत सुविधा वाढवण्याची वचनबद्धता अधोरेखित होते.

मध्य रेल्वेची गुंतवणूक आणि उत्पन्नात सातत्याने होणारी वाढ रेल्वे क्षेत्रातील वाढ आणि विकासाला चालना देण्यात महत्त्वाच्या भूमिकेला बळकटी देते.

# कोलकाताचा हैदराबादवर मोठा विजय

**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्स संघाने ईडन गार्डन्सच्या मैदानावर पुन्हा एकदा सनरायझर्स हैदराबादला पराभवाचा धक्का दिला. केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ १२० धावांवर १६.४ षटकांत सर्वबाद झाला. हैदराबादचा आयपीएलमधील हा सर्वात मोठा पराभव आहे.

कोलकाताचा चार सामन्यांमध्ये हा दुसरा विजय आहे, तर हैदराबादने सलग तिसरा सामना गमावत पराभवाची हॅट्ट्रिक साधली आहे. पुन्हा एकदा केकेआरने हैदराबादच्या सलामीवीरांना माघारी धाडले आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. हैदराबादची टॉप ऑर्डर कोसळल्यानंतर संघ पुन्हा सावरू शकला नाही आणि परिणामी त्यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघाची सुरुवात इतकी खराब झाली की संघ शेवटपर्यंत या धक्क्यांमधून सावरू शकला नाही. केकेआरकडून इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या वैभव अरोराने पहिल्याच षटकात कहर केला. त्याच्या



पहिल्या चेंडूवर हेडने चौकार मारला आणि पुढच्याच चेंडूवर त्याला झेलबाद करवत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हर्षित राणाने अभिषेक शर्माला दोन धावांवर असताना झेलबाद केले, तर इशान किशनही झेलबाद झाला.

नितीश कुमारने पुन्हा एकदा निराश केले आणि तो १९ धावा करत बाद झाला. कामिंदु मेंडिस २७ धावा, हेनरिक क्लासेनने ३३ धावांची सर्वात मोठी खेळी केली, पण तो संघाला शेवटपर्यंत थांबत विजयापर्यंत नेऊ शकला नाही, तर पॅट कमिन्स १४ धावा करत बाद झाला. केकेआरच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजीवर आळा घातला. वैभव अरोरा आणि वरूण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. आंद्रे रसेलने दोन, तर हर्षित राणा आणि सुनील नरेन यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी नाणेफेक गमावत केकेआरचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. केकेआरचीही सुरुवात खराब झाली होती. क्विंटन डी कॉक आणि सुनील नरेन स्वस्तात बाद झाले होते, पण अजिंक्य रहाणे आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्या भागीदारीने संघाचा डाव सावरला. अजिंक्य रहाणेने २७ चेंडूत एक चौकार आणि चार षटकारांसह ३८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर अंगक्रिश रघुवंशीने ३२ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांसह ५० धावांची खेळी केली.

वेंकटेश अय्यर जो सुरुवातीच्या सामन्यांमध्ये फेल ठरला होता. त्याने या सामन्यात २९ चेंडूत सात चौकार आणि तीन षटकारांच्या मगतीने ६० धावांची उत्कृष्ट खेळी केली, तर रिंकू सिंग १७ चेंडूत चार चौकार आणि एका षटकारासह ३२ धावा करत नाबाद परतला. रिंकू आणि वेंकटेशने मिळून अखेरच्या चार षटकांमध्ये ६६ धावा केल्या. हैदराबादकडून शमी, कमिन्स, झिशान अन्सारी, हर्षल पटेल आणि कामिंदू मेंडिस यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. या पराभवासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत अखेरच्या स्थानी गेला.

# गुजरात टायटन्सला झटका!

## गोलंदाज कागिसो रबाडा मायदेशी परतला

**गांधीनगर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुभमन गिलच्या गुजरात टायटन्स संघाला मोठा झटका बसला आहे. संघाचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा वैयक्तिक कारणांमुळे आयपीएल सोडून मायदेशी दक्षिण आफ्रिकेला परतला आहे. फ्रँचायझीने ही माहिती दिली. तथापि, जीटीच्या व्यवस्थापनाने रबाडा कधीपर्यंत पुनरागमन करेल याची संभाव्य तारीख दिली नाही.



गुजरात टायटन्सने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'रबाडा काही महत्त्वाच्या वैयक्तिक बाबींसाठी द. आफ्रिकेत परतला आहे.' द.आफ्रिकेच्या या गोलंदाजाने आयपीएल २०२५मध्ये आतापर्यंत फक्त दोन सामने खेळले आहेत. त्याने पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्सविरुद्ध १-१ विकेट घेतल्या. गुजरातचा तिसरा सामना बुधवारी एम चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळला गेला, पण त्या सामन्यात रबाडा वैयक्तिक कारणामुळे गुजरातच्या प्लेईंग इलेव्हनचा भाग नव्हता. त्याच्या जागी अष्टपैलू अर्शद खानला संधी देण्यात आली. अर्शदने विराट कोहलीला बाद केले.

आरसीबीविरुद्ध गुजरात टायटन्स संघ फक्त तीन विदेशी खेळाडूंसह मैदानात उतरला होता. यात जोस बटलर, रशीद खान आणि शेरफेन रदरफोर्ड यांचा समावेश होता. हा सामना गुजरात टायटन्सने आठ विकेट्स आणि १३ चेंडू राखून जिंकला.

गुजरात टायटन्सचा पुढील सामना ६ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादविरुद्ध आहे. हा सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे. यानंतर ९ एप्रिल रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सशी लढत होईल.

# कामिंदु मेंडिसने दोन्ही हातांनी गोलंदाजी करून विकेटही घेतली

**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात आयपीएलच्या लढतीत कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना रंगला. या सामन्यात हैदराबादच्या संघाकडून श्रीलंकन कामिंदु मेंडिसला आयपीएल पदार्पणाची संधी मिळाली. हा गोलंदाज आपल्या दोन्ही हातांनी गोलंदाजी करण्यात माहिर आहे. त्याने पहिल्याच आयपीएल सामन्यातील आपल्या पहिल्याच षटकात गोलंदाजीतील कलाकारी दाखवून दिली.





कोलकाताच्या डावातील १३व्या षटकात पॅट कमिन्स याने कामिंदु मेंडिसच्या हाती चेंडू सोपवला. त्याच्या या षटकातील पहिल्याच चेंडूवर अंगकृष्ण रघुवंशीने सिंगल धाव घेत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर स्टाइकवर आलेल्या व्यंकटेश अय्यरला कमिंदु मेंडिसने उजव्या हाताने गोलंदाजी केली. त्याने एक धाव घेतली. मग रघुवंशी पुन्हा स्ट्राइकवर आल्यावर कमिंदूने डाव्या हाताने गोलंदाजी केली. या चेंडूवर त्याला विकेटही मिळाली.

आयपीएलच्या मेगा लिलावात सनरायझर्स हैदराबादच्या संघाने या खेळाडूसाठी ७५ लाख रुपये मोजले होते. पदार्पणाच्या सामन्यातील पहिल्या षटकातच त्याने आपल्या गोलंदाजीतील कसब दाखवून देताना चौथ्या चेंडूवर आयपीएलमधील पहिली विकेट घेतली.

# भारताचा हितेश वर्ल्ड बॉक्सिंग कप फायनलमध्ये

**ब्राझिलिया : वृत्तसंस्था**

बॉक्सर हितेशने शुक्रवारी (दि. ४) भारतासाठी इतिहास रचला. ब्राझीलमध्ये सुरू असलेल्या वर्ल्ड बॉक्सिंग कप २०२५च्या अंतिम फेरीत त्याने धडक मारली असून अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय बॉक्सरपटू ठरला आहे.

हितेशने ७० किलो वजनगटात फ्रान्सच्या मकान त्राओरेचा ५-०ने पराभव केला. सर्व पाच पंचांनी हितेशच्या बाजूने निकाल दिला. या लढतीदरम्यान त्याचा एक गुण कमी करण्यात आला होता, पण तरीही भारतीय खेळाडूला कोणताही फटका बसला नाही. त्याआधी हितेशने इटलीच्या गॅब्रिएल गुइडी रोनटानीला ५-०ने पराभूत करून उपांत्य फेरीत स्थान मिळवले होते.

# पराभवानंतर पंतवर रागावले गोयंका?

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या इतिहासातील दुसरा सर्वात महागडा खेळाडू ठरलेला ऋषभ पंत अद्याप आपल्या कामगिरीने प्रभावित करण्यात अपयशी ठरला आहे. लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार असलेला पंत सुरुवातीच्या तिन्ही सामन्यात चांगली कामगिरी करू शकला नाहीये. त्याच्या नेतृत्वावरदेखील प्रश्न उभारले जात आहेत. पंजाबविरुद्धच्या पराभवानंतर लखनऊ संघाचे मालक संजीव गोयंका पंतवर संतापताना दिसले.

लखनऊला त्यांच्या घरच्या मैदानावर पंजाब किंग्जकडून पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करताना लखनऊ संघाने १७१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पंजाबने १६.२ षटकांत लक्ष्य गाठले आणि



आठ गडी राखून मोठा विजय नोंदवला. सामना संपल्यानंतर संजीव गोयंका ऋषभ पंतसह मैदानात उभे होते. संघाच्या पराभवानंतर संजीव गोयंका नाराज दिसत होते. ते पंतला हातवारे करूनही काहीतरी सांगताना दिसले.

सामना संपल्यानंतर संजीव गोयंका मैदानावर ऋषभ पंतशी बोलत असताना त्यांनी गतवर्षीच्या राहुल प्रकरणाची पुनरावृत्ती केल्याची चर्चा सोशल मीडियावर केली आहे. गेल्या वर्षी संघ सनरायझर्स हैदराबादविरूद्ध पराभूत झाल्यानंतर गोयंका राहुलवर भर मैदानात संतापले होते. त्यानंतर त्यांच्यावर बरीच टीका झाली होती. गोयंका मंगळवारी ऋषभ पंतला काय म्हणाले, हे माहित नसले तरी संघाच्या कामगिरीने ते आनंदी नसल्याचे दिसत होते. पंत-संजीव गोयंका यांच्या चर्चेचे फोटो पाहताच चाहत्यांनी लखनऊच्या मालकांवर टीका केली आहे.

# शेवटच्या वनडेतून चॅपमन संघाबाहेर

**माउंट मौंगानुई : वृत्तसंस्था**

पाकिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडला मार्क चॅपमनशिवाय खेळावे लागेल. फॉर्ममध्ये असलेला हा फलंदाज हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरण्यात अपयशी ठरला आहे.

नेपियरमध्ये झालेल्या मालिकेतील पहिल्या सामन्यात चॅपमनने वादळी शतक झळकावले होते, मात्र क्षेत्ररक्षण करताना त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली. त्यानंतर तो हॅमिल्टन येथील दुसरा सामना खेळू शकला नाही. ब्लॅककॅप्सने या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. अंतिम सामन्यासाठी चॅपमन तंदुरुस्त असेल अशी अपेक्षा होती, पण शुक्रवारी सराव करताना ३० वर्षीय चॅपमन फिटनेस चाचणीत अपयशी ठरला.

# धवनने खास अंदाजात दिली प्रेमाची कबुली

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी क्रिकेटर शिखर धवन पुन्हा एकदा प्रेमात पडला आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत तो एका मिस्ट्री गर्लसोबत दिसला अन् या दोघांमध्ये प्रेमाचा खेळ सुरू असल्याची चर्चा रंगण्यास सुरुवात झाली. आता खुद्द धवनने गर्लफ्रेंडच्या समोर खास अंदाजात प्रेमाची कबुली दिलीये.

एका कार्यक्रमातील शिखर धवनला पुन्हा एकदा प्रेमात पडण्यासाठी तयार आहेस का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर क्रिकेटरने मी प्रेमात पडलोय, असा रिप्लाय दिला. लगेच त्याला गर्लफ्रेंडच नाव काय? असा



प्रश्न विचारण्यात आला. यावर मी नाव सांगणार नाही असे म्हणत त्याने ज्या सोफीसोबत नाव जोडले गेले आहे तिच्यासोबत रिलेशनशिपमध्ये असल्याची गोष्ट मान्य केली. अगदी हटके अंदाजात त्याने प्रेमाची कबुली दिली.

### कोण आहे गर्लफ्रेंड सोफी?

सोफी शाइन ही चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेवेळी शिखर धवनसोबत दिसली होती. याआधीही ती धवनसोबतच्या फ्रेममध्ये स्पॉट झाली होती. धवनची सुंदर गर्लफ्रेंड आयर्लंडची नागरिक आहे. ती एक आयरिश प्रोडक्ट कन्सल्टंटच्या रुपात काम करते. सोफीने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून फॅमिलीसोबतचे काही फोटो शेअर केले आहेत, ज्यात धवनचीही झलक पहायला मिळाली होती. मोस्ट ब्युटीफुल गर्ल इन धिस रूम... इज माय गर्लफ्रेंड असे म्हणत त्याने नव्या प्रेमाची हटके अंदाजात ओळख करून दिली.

# कुणालाही सहजपणे घेऊ नका -रिकी पाँटिंग



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयपीएलमध्ये कोणत्याही प्रतिस्पर्धी संघाला सहजपणे घेऊ नका, असा मोलाचा सल्ला पंजाब किंग्जचा मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग याने आपल्या खेळाडूंना दिला.

लखनऊ सुपर जायंट्स संघावर विजयानंतर अर्धशतकी खेळी करणारा कर्णधार श्रेयस अय्यर याची तुलना पाँटिंगने रॉल्स रॉयस तिसऱ्या गिअरमध्ये अशी केली तसेच तो म्हणाला, आम्ही जे काही केले त्यापेक्षा आक्रमक होण्याची गरज नाही. काहीही सहजपणे घेऊ नका.

कुटुंबासारखे सामूहिक प्रयत्न करून पुढे जाऊया. कोणताही खेळाडू पहिल्यांदा खेळत असो वा त्याला प्रथमच संधी मिळत असो, प्रत्येकाचे योगदान मोलाचे आहे. त्याचवेळी प्रतिस्पर्धी कमकुवत नाहीत याचीही जाणीव असू द्या, असेही पाँटिंगने म्हटले.






# ...म्हणून यशस्वीने गोव्याची ऑफर स्वीकारली



**मुंबई : प्रतिनिधी**


भारतीय संघाचा सलामीवीर आणि मुंबईचा युवा क्रिकेटपटू यशस्वी जयस्वाल याने मुंबईचा संघ सोडून गोव्याच्या संघाकडून खेळण्याचे निश्चित केल्याचे समोर आहे. यशस्वीने मुंबईचा संघ सोडून गोव्याकडून खेळण्याचा निर्णय का घेतला याची माहितीही समोर आली आहे.

खरंतर यशस्वी जयस्वालकडे मुंबईच्या क्रिकेट संघाचे भविष्य आणि भविष्यातील नेतृत्व म्हणून पाहिले जात होते, मात्र आता गोव्याच्या संघाकडून यशस्वीला कर्णधारपदाची ऑफर देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गोव्याच्या संघाने हल्लीच रणजी क्रिकेटच्या प्लेट डिव्हिजनमधून एलिट डिव्हिजनमध्ये प्रवेश केलेला आहे. गोव्याकडून खेळण्याच्या निर्णयाबाबत यशस्वी जयस्वाल म्हणाला की, गोव्याने मला नवी संधी दिली आहे. त्यांनी मला संघाचे नेतृत्व सोपवले आहे. सध्यातरी भारतीय क्रिकेट संघासाठी चांगली कामगिरी करणे हे माझ्यासमोरील पहिले लक्ष्य आहे. जेव्हा मी राष्ट्रीय संघात नसेन तेव्हा मी गोव्याकडून खेळेन तसेच संघाला स्पर्धेत पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करेन.

यशस्वीने पुढे सांगितले की, आज मी जो काही आहे तो मुंबईच्या क्रिकेट संघामुळे आहे. या शहराने मला घडवले आहे. मी मुंबई क्रिकेट संघटनेचा कायम ऋणी राहीन.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com